सेव्हींग व करंट खात्यांवर मिळवा
7% व्याजदर
दि जैन मर्चन्टस् को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.
इमारत कंपनी, पोस्ट ऑफिस जवळ, कापड बाजार, अ.नगर.
फोन नं. : 0241-2993900
श्री. संजय काठेड (संस्थापक) Mo. 9372444001

संस्थापक के. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

सुवर्ण विश्वातील सर्वात जूनी..
विश्वसनीय व नामांकित पेढी...
मे. हरी बाकाजी देडगांवकर
Since 1935
सराफ अँण्ड ज्वेलर्स
२५७१, एम.जी.रोड, कापड बाजार, अहमदनगर.
फोन : २३४६४४३. मो. ९८२२९९१०२४.

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. ०९.०५.२०२६ | अंक नं. ०३३ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर...
२०१ भाग्यवंत जोडप्यांना चक्क FREE हनिमून टूर
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी..
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹ १९९/-*
2014 पासुन आपल्या सेवेत.. सोनेरी नातं..
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

## पश्चिम बंगालपाठोपाठ अहिल्यानगरमध्येही होणार एसआयआर; 'मॅपिंग' न करणाऱ्या मतदारांचे नाव यादीतून होऊ शकते बाद !

**मॅपिंगला उरले अवघे तीन दिवस, अन्यथा सुनावणीस सामोरे जावे लागणार**

नगर – मतदार याद्या अद्यावत करण्याच्या अनुषंगाने पश्चिम बंगाल, तामिळनाडू, गोवा, गुजरातपाठोपाठ आता महाराष्ट्रात एसआयआर कार्यक्रम जाहीर होणार आहे. एसआयआरच्या पडताळणीपूर्वी मतदारांचे मॅपिंग करण्याचे काम अहिल्यानगर शहरासह जिल्ह्यात सुरु आहे. ज्या मतदारांचे मॅपिंग होणार नाही, त्यांचे नाव मतदार यादीतून बाद होऊ शकते किंवा त्यांना एसआयआर प्रक्रियेत सुनावणीस सामोर लावे लागणार आहे. त्यामुळे एसआयआरपूर्वीच मतदारांनी मॅपिंग करुन घ्यावे, असे आवाहन अहिल्यानगर शहर विधानसभा मतदार संघाचे मतदार नोंदणी अधिकारी सुधीर पाटील यांनी केले आहे.

अहमदनगर शहर विधनसभा मतदार संघामध्ये मागील ५ महिन्यांपासून मतदारांचे मॅपिंग करणे करीता मतदान केंद्रस्तरीय अधिकारी, पर्यवेक्षक हे मतदारांच्या दारापर्यंत पोहोचत आहेत, मोहीमेची मुदत पुढील सप्ताहात संपत असून, मतदार योग्य तो प्रतिसाद देत नसल्याने मोहीम संथगतीने सुरु आहे. एक ना अनेक कारणे देत नागरीक या मोहिमेत सहभागी होत नसल्याचे चित्र आहे. जिल्ह्याचे सरासरीपेक्षा शहर मतदार संघाचे काम कमी आहे. एसआयआर कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाकडून कोणत्याही वेळी लागू होण्याची शक्यता असल्याने मतदार यादी पडताळणी करण्याचे काम युध्दपातळीवर चालू आहे. मतदार याद्यांचे पडताळणी करणे करीता सन २००२ मधील मतदार संघ, मतदार यादी, भाग क्रमांक आणि यादीतील अनुक्रमांकाचा आधार घेतला जात आहे. मतदारांनी मतदार ओळखपत्र दाखविल्यानंतर बीएलओ या बाबींची पडताळणी करणार आहे. सन २००२ च्या मतदार यादीत नाव नसेल आणि त्यानंतर मतदार यादीत नाव नोंदणी झाली असेल तर त्यांना आई वडील, आजी आजोबांच्या नावाचे आधारे मॅपिंग करता येईल, ही प्रक्रिया कोणी पूर्ण केली नाही तर एसआयआरच्या दरम्यान सुनावणी होऊन पुराव्यांची पडताळणी झाल्यावरच मतदार यादीत नाव समाविष्ट केले जाणार आहे. मॅपिंगच्या मोहिमेत सहभागी होऊन भविष्यातील किचकट प्रक्रियेपासून दूर राहण्यासाठी मतदारांनी मॅपिंगच्या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन अहमदनगर शहर विधानसभा मतदार संघाचे मतदार नोंदणी अधिकारी सुधीर पाटील यांनी केले आहे.

## सीना नदीत नवजात अर्भक मृतावस्थेत आढळले

### अपत्य जन्माची माहिती लपवण्याच्या उद्देशाने अज्ञाताचे कृत्य, गुन्हा दाखल

नगर – शहर परिसरातील आनंदनगर येथील सीना नदीच्या पात्रात एका अज्ञात नवजात पुरुष जातीच्या अर्भकाचा मृतदेह आढळून आला आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आनंदनगर येथील विक्रांत जिमच्या मागील बाजूस असलेल्या सीना नदीच्या पात्रातील सिमेंटच्या नाल्यात एक अर्भक तरंगत असल्याची माहिती नगरसेवक दत्ता गाडळकर यांनी पोलिसांना दिली होती. या माहितीच्या आधारे कोतवाली पोलीस ठाण्याचे गुन्हे शोध पथकाचे पोलीस कॉन्स्टेबल अमोल गाढे, महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात आणि पोलीस पथकाने घटनास्थळी धाव घेतली.

घटनास्थळी अंदाजे आठ दिवस वयाचे पुरुष जातीचे अर्भक पालथ्या अवस्थेत पाण्यात तरंगताना दिसून आले. या अर्भकाचा मृतदेह कुजलेल्या स्थितीत होता. पोलिसांनी तातडीने अग्निशमन दल आणि न्यायवैद्यक पथकाला पाचारण केले. नायब तहसीलदार गणेश भानवसे आणि पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाटील यांच्या उपस्थितीत पंचनामा करून मृतदेह पात्राबाहेर काढण्यात आला. कोणीतरी अज्ञात व्यक्तीने आपल्या अपत्य जन्माची माहिती लपवण्याच्या उद्देशाने या अर्भकाचा मृतदेह नदीत फेकून देऊन त्याची विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न केला आहे. याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल अमोल गाढे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कोतवाली पोलिसांनी भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ९४ नुसार गुन्हा नोंदवला आहे. तपास पोलीस हवालदार वाघ हे करत आहेत.

## जनतेला सक्ती करण्याअगोदर स्वतः हेल्मेट वापरा; पोलीस अधीक्षकांच्या आदेशाची अंमलबजावणी सुरु



(छाया – बबलू शेख)

**पोलीस मुख्यालय, पोलीस अधीक्षक कार्यालयात १२ पोलिसांवर कारवाई**

नगर – दुचाकी चालवताना डोक्यात हेल्मेट घालावे, हा नियम केवळ सामान्य जनतेसाठीच नाही, तर कायद्याचे रक्षण करणाऱ्या पोलिसांसाठीही तितकाच अनिवार्य आहे. जनतेला सक्ती करण्याअगोदर कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या पोलिसांनी स्वतःपासून हेल्मेट सक्तीची अंमलबजावणी करण्याचे आदेश जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी दिले आहेत. तसेच जे पोलीस कर्मचारी हेल्मेट वापरणार नाहीत, त्यांच्यावर कारवाईही सुरु करण्यात आली आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन यांनी सर्व पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना हेल्मेट वापरणे बंधनकारक केले आहे. तसेच जे कर्मचारी हेल्मेट वापरणार नाहीत, अशांवर थेट कारवाईचे आदेश दिले आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार शहर वाहतूक शाखेच्या वतीने ८ मे रोजी पोलीस मुख्यालय आणि पोलीस अधीक्षक कार्यालय परिसरात हेल्मेट न वापरणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. पोलीस मुख्यालय येथे ५ पोलीस कर्मचाऱ्यांवर तर पोलीस अधीक्षक कार्यालय येथे ७ पोलीस कर्मचारी अशा एकूण १२ पोलीस कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. त्यानंतर ९ मे रोजी पुन्हा पोलीस मुख्यालय आणि पोलीस अधीक्षक कार्यालय येथे वाहतूक शाखेने कारवाईची मोहिम राबविली. परंतु कारवाई सुरु झाल्यानंतर सर्व अधिकारी, कर्मचारी हेल्मेट वापरु लागल्याचे दिसून आले. ही कारवाई वाहतूक शाखेचे पोलीस कॉन्स्टेबल सचिन पवार आणि गहिनाथ दहिफळे यांनी केली.

### आता पोलीस ठाण्यांचा नंबर

मुख्यालय आणि एसपी ऑफिसनंतर आता ही मोहीम जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशन स्तरावर राबवण्यात येणार आहे. ड्युटीवर येताना किंवा खासगी कामासाठी दुचाकी वापरताना हेल्मेट नसेल, तर संबंधित पोलीस कर्मचाऱ्यावर कठोर कारवाई करण्याचे संकेत पोलीस अधीक्षकांनी दिले आहे. समोर कोणीही असो, हेल्मेट नसेल नियमानुसार कारवाई करा, असे सक्त आदेश पोलीस अधीक्षकांनी वाहतूक शाखेला दिले आहेत..

उठावना (पगडी रस्म )

स्वर्गीय गुलशन कुमार जग्गी
अत्यंत दुःख के साथ सूचित किया जाता है की, हमारे पूज्य पिताजी
स्वर्गीय गुलशन कुमार जग्गी
इनका स्वर्गवास मंगलवार दि. ०५/०५/२०२६ को हुआ है
उठावना (पगडी रस्म )
सोमवार दि. ११/५/२०२६ को दोपहर १२ से १ के बीच
गुरुद्वारा भाई दयासिंगजी, गोविंदपुरा, अहिल्यानगर में संपन्न होगा |
- दुःखांकित -
डॉ.नितीन जग्गी, राहुल जग्गी, नवीन जग्गी, समस्त जग्गी, व चड्ढा, अरोरा, सहानी, खुराणा, विखोना, परिवार एवम् सर्व मित्र परिजन

महेंद्र पेडावाला
रजवाडी गुजराती थाळी
दर रविवारी दालबाटी स्पे. आमरस
पार्सल सुविधा उपलब्ध..
किटी पार्टी व बर्थडे पार्टीसाठी खास सोय.
कापड बाजार, अहिल्यानगर

रत्नकमल™ चहा
10 किलो मागे 1 मोठी पिशवी फ्री..फ्री..
कृपया जवळच्या किराणा ड्रायफ्रुट दुकानदारांना संपर्क करा
ब्रॅंडेड कंपनीचा चहा व रत्नकमल चहा
एक वेळेस जरुर तुलना करुन पहा
आशिष ट्रेडर्स चहा पावडरचे ठोक व किरकोळ विक्रेते
Contact : 8767369367
इतर कंपन्या पेक्षा 50 ते 70 रुपये कमी किलो मागे स्वस्त दर्जा त्यापेक्षाही उत्तम.

१० वी/१२वी/पदवीला कमी मार्कस् मिळाले किंवा नापास झालात !
चिंता कशाला ? प्रत्येक विद्यार्थी तर डॉक्टर, इंजिनिअर, आर्किटेक्ट होऊ शकत नाही. मार्क कमी मिळाले किंवा नापास झालात म्हणुन आपल्या आयुष्याचे सर्व पर्याय बंद झालेत असे नाही. परमेश्वर एक दरवाजा बंद करतो तर दुसरा उघडतो. निराश होण्याची गरज नाही. इथे उज्वल भवितव्य घडविण्यासाठी दुसरा दरवाजा उघडा आहे या व प्रत्यक्ष भेटा.
दर्जेदार शिक्षण — प्रवेश सूचना — दर्जेदार नोकरी
कालावधी : एक/दोन वर्षे • पात्रता : १० वी / १२ वी / पदवीधर (पास/नापास)
INSTITUTE OF PARA MEDICAL SCIENCES
1) नर्सिंग कोर्सेस
2) PGDMLT - P.G. Dip. in Medical Lab Tech
3) DMLT - Dip in Medical Lab Tech.
4) Health & Sanitory Inspector
5) Operation Theater Assis. / Tech.
6) CCH / CGO / CCS - 2 Months (Dr. of any faculty)
7) Hospital Management
8) Dip. Course in Physiotherapy
9) X-Ray / ECG / C.T. Scan / MRI / Sonography / Dialysis / Cath Lab Tech.
10) Dental Mechanics Tech./ Hygienist Tech. कृत्रिम दात, फ्रेम, कवळी बनविणे व रिपेअर करणे.
11) Dental Assistant दाताची व दातांची देखरेख करणे.
12) Optometry / Optician Tech चष्मांचे नंबर काढणे, चष्मे, काचा व फ्रेम बनविणे. Contact Lences.
BOMBAY ACADEMY OF ARTS & EDUCATION
1) Pre Primary Teachers Course (बालवाडी/अंगणवाडी शिक्षिका)
MONTESSORI COURSE
2) Beauty Parlor & Hair Dressing
3) Fire & Safety Management
4) बांधकाम पर्यवेक्षक (ITI समकक्ष)
5) Computer Technology (Operating System, Graphics Designing, Website Designing, Software Developer, Networking, Database Operator)
J.J.M.F. JIVAN JYOT MEDICAL FOUNDATION
बॉम्बे हॉस्पिटल/बेकर्स समोर, वन विभाग कार्यालय मागे, अ.नगर-छ.संभाजी नगर रोड, अहिल्यानगर
Mo. 8830685732 | Visit us : www.jjmf.info | Email : jjmf@rediffmail.com
उपरोक्त सर्व पदांसाठी मागणी जास्त व उमेदवार कमी असल्यामुळे नोकरीची १००% संधी

मयुरी लेडिज मॉलसाठी कामासाठी गरजू मुली/महिला पाहिजेत
कामाची वेळ : सकाळी ९.३० ते सायंकाळी. ८.३० पार्ट टाईमपण चालेल
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल
मयुरी लेडिज मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर
Mo. 9823268658

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# वाहतुकीला अडथळा करणाऱ्या चितळे रोड व आयुर्वेद चौकातील ‘१८ विक्रेत्यांवर’ कारवाई

नगर - शहरातील अतिवर्दळीचा रस्ता असलेला चितळे रोड आणि आयुर्वेद चौकातील रस्त्यांवर अतिक्रमण करून वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्या पथारी व्यावसायिकांविरुद्ध महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाने कारवाईची मोहीम राबवली. या कारवाईत चितळे रोड आणि आयुर्वेद चौक परिसरातील एकूण १८ व्यावसायिकांवर कारवाई करण्यात आली. तसेच अनधिकृतपणे लावण्यात आलेले फ्लेक्स बोर्ड हटविण्यात आले.

रस्त्याच्या कडेला पथारी मांडून, हातगाड्या लावून वाहतुकीला अडथळा केला जात असल्याची तक्रार महापालिकेला प्राप्त झाली होती. रस्त्यावर हातगाड्या लावल्यामुळे मुख्य रस्त्याची रुंदी कमी होऊन वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. तसेच पादचाऱ्यांना चालण्यासाठी जागा उरत नसल्याने अपघाताचा धोकाही वाढला असल्याचे या तक्रारीत म्हटले होते. त्यानंतर महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या पथकाने शहरातील चितळे रोड आणि आयुर्वेद चौक परिसरात जावून खात्री केली असता काही व्यावसायिकांनी रस्त्यावरच हातगाड्या लावल्याचे दिसून आले तर काहींनी रस्त्याकडेला ट्रे मांडून व पथारी मांडून मालाची विक्री सुरु केल्याचे दिसून आले. महापालिकेच्या पथकाने संबंधितांवर कारवाई करीत काहींचे साहित्य जप्त केले तर काहींवर दंडात्मक कारवाई केली. रस्त्यावर बसून व वाहनांना अडथळा निर्माण करून व्यवसाय करणाऱ्या १८ लोकांवर प्रत्यक्ष कारवाई करण्यात आली. या कारवाईमुळे विक्रेत्यांची मोठी पळापळ झाली.


रस्त्यावर पथारी मांडून मालाची विक्री करणाऱ्यांवर कारवाई करताना महापालिकेच्या अतिक्रमण विभागाचे पथक.

चितळे रोड व आयुर्वेद चौक परिसर हे अत्यंत गजबजलेले परिसर आहेत. त्यामुळे येथे रहदारीला व वाहतुकीला अडथळे येतात. रस्त्यावरील अतिक्रमणामुळे वाहतुकीची कोंडी होऊन सर्वसामान्यांना नाहक त्रास सहन करावा लागतो. वारंवार सुचना देवूनही काही विक्रेते पुन्हा पुन्हा रस्त्यावर पथारी मांडतात, हातगाड्या लावतात. अशा विक्रेत्यांविरोधात ही कारवाई सुरुच राहणार असल्याचे महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून सांगण्यात आले.

## खरं वारस काय देतो आपण?


राजन कुटे

काही संभाषणं गुंतवणुकीपासून सुरू होतात, पण नकळत आयुष्यावर येऊन थांबतात. काही दिवसांपूर्वी एका ज्येष्ठ गुंतवणूकदाराशी बोलणं झालं. वय सत्तरच्या पुढे. शेतीशी आयुष्यभर जोडलेले. बाजारातील अनिश्चितता, जगभरातील घडामोडी आणि काही वर्षांपासून अपेक्षेप्रमाणे वाढ न दिसल्यामुळे त्यांनी गुंतवणूक काढून घ्यावी का, असा प्रश्न विचारला. संभाषण पुढे जात असताना विषय हळूहळू आकड्यांपासून आयुष्याकडे वळला.

शेती करणाऱ्या माणसाला प्रतीक्षा नवीन नसते. प्रत्येक हंगाम सारखा नसतो, प्रत्येक पेरणी लगेच फळ देत नाही आणि प्रत्येक वर्ष सारखं जात नाही, हे त्याने आयुष्यभर अनुभवलं असतं. तरीही तो पेरणं थांबवत नाही. कारण त्याला माहीत असतं की काही गोष्टी वेळ घेणारच. हे बोलताना त्यांच्या चेहऱ्यावर हलकंसं स्मित आलं. कदाचित गुंतवणुकीपेक्षा आयुष्याचाच आरसा त्यांना त्या क्षणी दिसला असावा.

अनेक वेळा आपण मुलांसाठी, कुटुंबासाठी किंवा पुढच्या पिढीसाठी आर्थिक नियोजन करत असतो. पण त्या प्रक्रियेत नकळत एक मोठा प्रश्न मागे राहतो-आपण नेमकं पुढे काय सोडून जातो आहोत? केवळ पैसा, मालमत्ता आणि गुंतवणूक? की पैशाकडे पाहण्याची एक पद्धतही?

कारण वारसा हा फक्त मालकीचा नसतो; तो विचारांचाही असतो. घरात पैसे कसे वापरले गेले, अडचणीच्या काळात निर्णय कसे घेतले गेले, संयम कसा ठेवला गेला, आणि अनिश्चिततेत घाबरून न जाता स्थिर कसं राहायचं-हे सगळं पुढची पिढी शांतपणे पाहत असते.

आज अनेक तरुणांकडे माहिती भरपूर आहे, पर्यायही भरपूर आहेत. पण स्पष्टता मात्र कमी दिसते. कमाई वाढली आहे, पण पैशाशी नातं अधिक शांत झालं आहे का, हा प्रश्न आहे. कारण आर्थिक शहाणपण हे केवळ किती कमावलं यावर ठरत नाही; ते पैशाकडे किती स्थिरपणे पाहता येतं यावरही ठरतं.

काही घरांमध्ये मुलांना संपत्ती मिळते. काही घरांमध्ये त्याहून महत्त्वाची गोष्ट मिळते-आर्थिक निर्णय घेताना घाई न करण्याची सवय. प्रत्येक चढउताराला प्रतिक्रिया न देण्याची वृत्ती. आणि वेळेला आपलं काम करू देण्याची समज.

कदाचित पुढच्या पिढीसाठी आपण देऊ शकणारा सर्वात मोठा वारसा हा पैसा नसून पैशाकडे पाहण्याची शांत दृष्टी असू शकते.

शेवटी, गुंतवणूक ही केवळ परताव्याची गोष्ट नसते. ती आयुष्याकडे पाहण्याच्या दृष्टिकोनाशीही जोडलेली असते.

शांत ठेवा, स्पष्ट ठेवा

- **राजन कुटे,** अँफी नोंदणीकृत मुच्यूअल फंड वितरक
मो. ९४०३३७४६७४ /९४२३७०८६७०

# केडगावातील समारंभातून चोरीला गेलेले १६ तोळे सोन्याचे दागिने मध्यप्रदेशातील टोळीकडून हस्तगत

नगर - केडगाव येथील साखरपुडा समारंभातून चोरीला गेलेल्या सुमारे १६ तोळे सोन्याच्या दागिन्यांचा गुन्हा कोतवाली पोलिसांनी अवघ्या काही दिवसांत उघडकीस आणला आहे. मध्यप्रदेशातील राजगड जिल्ह्यात जाऊन तब्बल दोन दिवस कोंबिंग ऑपरेशन राबवत पोलिसांनी चोरीचा मुद्देमाल हस्तगत केला. विशेष म्हणजे, या कारवाईत अल्पवयीन मुलांचा वापर करून देशभरातील लग्न व साखरपुडा समारंभांना लक्ष्य करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश झाला आहे.

२ मे रोजी रात्री केडगाव येथील श्रेया गार्डनमध्ये आयोजित साखरपुडा समारंभात शिक्षिका सिंधु महेश माने (वय ५२, रा. तिसगाव, ता. पाथर्डी) यांच्या कापडी पिशवीत ठेवलेले १६ तोळ्यांचे सोन्याचे दागिने चोरीला गेले होते. समारंभातील गडबडीचा आणि लाईट गेल्याचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी ही चोरी केली. कोतवाली पोलिसांनी गुन्हा दाखल होताच तांत्रिक विश्लेषण व सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास सुरू केला. सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले असता एक अल्पवयीन मुलगा संशयित म्हणून समोर आला. तपासादरम्यान हा प्रकार एका संघटित टोळीमार्फत घडवून आणण्यात आल्याचे स्पष्ट झाले. विशेष म्हणजे, ही टोळी अल्पवयीन मुलांना पुढे करून देशभरातील लग्न, साखरपुडा व इतर कौटुंबिक कार्यक्रमांमध्ये चोरी करत असल्याची माहिती समोर आली.

त्यानुसार पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे आणि पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक कुणाल सपकाळे यांच्यासह पोलिस अंमलदार विनोद बोरगे, विशाल दळवी, सूरज कदम यांचे विशेष पथक मध्यप्रदेशात रवाना झाले.राजगड जिल्ह्यातील बोटा पोलीस ठाणे हद्दीतील चार गावांमध्ये स्थानिक पोलिसांच्या मदतीने दोन दिवस विशेष कोंबिंग ऑपरेशन राबविण्यात आले. या कारवाईदरम्यान उत्तरप्रदेश, दिल्ली व गोवा पोलिसांची पथकेही त्याच भागात दाखल झाली होती. कारण, या भागातील काही टोळ्या देशभरातील चोरीच्या गुन्ह्यांत सक्रिय असल्याची नोंद विविध राज्यांच्या पोलिसांकडे आहे. पोलिसांनी सीसीटीव्हीत दिसणाऱ्या अल्पवयीन मुलाच्या नातेवाईकांना ताब्यात घेऊन चौकशी केली. पोलिसांनी दाखवलेल्या पुराव्यांनंतर संबंधितांनी चोरीची कबुली दिली व चोरीतील सोन्याचे दागिने पोलिसांच्या हवाली केले.

### धोकादायक भागात धाडसी मोहीम

राजगड जिल्ह्यातील बोटा पोलीस ठाणे हद्दीतील चार गावांमध्ये चोरीच्या टोळ्यांचे जाळे सक्रिय असल्याचे यापूर्वीही उघड झाले आहे. या गावांमध्ये तपासासाठी गेलेल्या पोलिसांवर हल्ल्याच्या घटनाही पूर्वी घडल्या आहेत. अशा परिस्थितीत स्थानिक पोलिसांच्या मदतीने कोतवाली पोलिसांनी केलेली कारवाई धाडसी मानली जात आहे. चोरी करणारा मुलगा अल्पवयीन असल्याने त्याला नोटीस देण्यात आली असून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे.

# घर खाली करण्यासाठी महिलेवर जीवघेणा हल्ला

नगर - नगर तालुक्यातील कापूरवाडी परिसरात घर रिकामे करण्याच्या कारणावरून एका महिलेला आणि तिच्या कुटुंबियांना बेदम मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी सात जणांविरुद्ध भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत रेश्मा राजू शेख (रा.महाडूक सेंटर, कापूरवाडी) यांनी फिर्याद दिली आहे. पीडित महिला आपल्या कुटुंबासह या ठिकाणी वास्तव्यास आहे. ३ मे रोजी सायंकाळी ७ च्या सुमारास घराच्या जागेवरून असलेल्या वादातून आरोपी शोएब ऊर्फ सोनू जानू शेख, शौकत गुलाब शेख, अरबाज बाबा शेख, असलम बाबा शेख, अजिज गुलाब शेख, इसाल शेख आणि बाबा हबीब शेख यांनी बेकायदेशीर जमाव जमवला. यावेळी आरोपींनी पीडितेला घर खाली करण्यासाठी अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.

वादाचे रूपांतर मारहाणीत होऊन आरोपींनी पीडितेला आणि उपस्थित साक्षीदारांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. आरोपींनी धारदार शस्त्राने पीडितेच्या कानामागे आणि छातीवर वार करून तिला गंभीर जखमी केले. तसेच यावेळी सर्वांना जीवे मारण्याची धमकीही देण्यात आली. जखमींना तातडीने उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. रुग्णालयातील जबाबानुसार पोलिसांनी सातही आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवला असून सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगिर या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# निरीक्षकांच्या बदलीच्या आश्वासनानंतर सराफ सुवर्णकार समितीचे आंदोलन मागे

### पोलिसांना कारणे दाखवा नोटीस

नगर - कोतवाली पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून झालेल्या अमानुष मारहाणीच्या निषेधार्थ सराफ सुवर्णकार संरक्षण समितीच्या वतीने सुरू केलेले आंदोलन अखेर दहाव्या दिवशी मागे घेण्यात आले. जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी दोषींवर कारवाईचे लेखी आश्वासन दिल्यानंतर कोतवालीचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या हस्ते लिंबू पाणी घेऊन काकासाहेब बुऱ्हाडे व उमेश बुऱ्हाडे यांनी उपोषणाची सांगता केली.


सराफ सुवर्णकार संरक्षण समितीचे काकासाहेब बुऱ्हाडे, उमेश बुऱ्हाडे यांना लेखी आश्वासन देताना पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड. समवेत प्रकाश लोळगे, सुभाष कायगावकर, रावसाहेब बेद्रे व अन्य.

बोधेगाव (ता. शेवगाव) येथील सराफ व्यावसायिक भागवत आधापुरे यांना चोरीच्या गुन्ह्यातील तपासासाठी कोतवाली पोलिसांनी ताब्यात घेतले होते. या प्रकरणाची माहिती घेण्यासाठी समितीचे अध्यक्ष उमेश बुऱ्हाडे आणि इतर व्यावसायिक पोलीस ठाण्यात गेले असता तेथील गोपनीय पथकातील कर्मचाऱ्यांनी सराफ व्यावसायिकांना अमानुष मारहाण केली होती. या घटनेच्या निषेधार्थ २८ एप्रिलपासून जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू करण्यात आले होते.

या आंदोलनाची दखल घेत तत्कालीन पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी शहर पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे यांच्याकडे या प्रकरणाची चौकशी सोपवली होती. चौकशी अहवालातील पुराव्यांच्या आधारे नूतन जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी दोषी कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. यामध्ये तुमचे एक वर्षाचे वेतन का थांबवण्यात येऊ नये? अशी विचारणा करण्यात आली असून, संबंधित उपनिरीक्षकाची बदली करण्याचे लेखी आश्वासनही देण्यात आले आहे. या आश्वासनंतर कोतवालीचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या हस्ते लिंबू पाणी घेऊन या उपोषणाची सांगता करण्यात आली.

दरम्यान पोलीस प्रशासन आणि आंदोलनकर्ते यांच्यातील पेच सोडवण्यासाठी स्थानिक सराफ सुवर्णकार संघटनेचे सुभाष मुथ्था, प्रकाश लोळगे, सुभाष कायगावकर, प्रमोद बुऱ्हाडे, रावसाहेब बेद्रे आणि मुकुंद रत्नापुरकर यांनी महत्त्वाची मध्यस्थी केली.

वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांशी चर्चा घडवून आणल्याने अखेर या प्रकरणावर तोडगा निघाला.



**दक्षता, शांतता कमिटी, अनिस नगर शाखेच्या वतीने पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांचा स्वागत**

पोलीस दक्षता समिती, नगर शांतता कमिटी व अनिस अहिल्यानगर समितीच्या वतीने पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांचे स्वागत केले. यावेळी शांतता समितीच्या नलिनी गायकवाड, अॅड. गीता कटारिया, नीता बर्वे, रजनी ताठे, अॅड. विद्या शिंदे, अनंतराव गारदे, रवी सातपुते, राजेंद्र कर्डिले, रिजवान शेख, राजू देठे, सचिन ठोंबरे, सोमनाथ जंगम देवा आदीसह पदाधिकारी उपस्थित होते.

## केडगावमध्ये वृद्धाला शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी

नगर - केडगाव परिसरातील सातपुते गल्लीत पिण्याच्या पाण्याची पाइपलाइन आणि ड्रेनेज वाहिनी तोडल्याबाबत विचारणा करणाऱ्या एका ७२ वर्षीय वृद्धाला शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

याबाबत शंकर हरीभाऊ ठोंबरे (वय ७२, रा.सातपुते गल्ली, केडगाव) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी आणि आरोपी इक्बाल हमीद सय्यद हे एकमेकांचे शेजारी आहेत. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यात किरकोळ कारणावरून वाद सुरू होते. २५ एप्रिल रोजी सकाळी साडेदहा वाजेच्या सुमारास आरोपीने ठोंबरे यांच्या घराची ड्रेनेज लाईन आणि पिण्याच्या पाण्याची पाइपलाइन तोडून नुकसान केले. इतकेच नव्हे तर घराच्या खिडकीवर आणि सेफ्टी टँकवर मुरुम टाकून अडथळा निर्माण केला.

जेव्हा ठोंबरे यांनी या प्रकाराबाबत विचारणा केली, तेव्हा आरोपी इक्बाल सय्यद याने रागाच्या भरात त्यांना शिवीगाळ केली. तसेच तुला जिवंत सोडणार नाही अशी धमकी देऊन परिसरात दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला. या घटनेनंतर घाबरलेल्या ठोंबरे यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

## श्रीमती भामबाई भागवत यांचे निधन

श्रीरामपूर - राहाता तालुक्यातील रुई येथील श्रीमती भामबाई बाबुराव भागवत (वय ९६) यांचे निधन झाले. त्यांचे पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.



अशोक सहकारी साखर कारखान्याचे कार्यालय अधिक्षक विक्रांत भागवत, अभियंता श्रीकांत भागवत, मंगेश भागवत यांच्या त्या आजी तर रुई गावातील शेतकरी बाळासाहेब भागवत व राजेंद्र भागवत यांच्या मातोश्री होत.

## हभप दिलीप अंचवले यांचे हृदयविकाराने निधन

नगर - धाकटी पंढरी ऊरुर (ता.शेवगाव) येथील रहिवासी हभप दिलीप दिनकर (महाराज) अंचवले (वय ५७) यांचे ८ मे रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर ऊरुर त्रिवेणी संगमावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे वडील, पत्नी, १ भाऊ, भावजय, १ मुलगा, १ मुलगी, जावई असा परिवार आहे. एडीसीसी बँकेच्या शेवगाव शाखेचे ते शाखाधिकारी होते.





**भारतीय जनता पार्टीच्या शहर जिल्हा उपाध्यक्षपदी महावीर कांकरिया यांची निवड**

भारतीय जनता पक्षाच्या अहिल्यानगर शहर जिल्हा उपाध्यक्षपदी महावीर कांकरिया यांची निवड करण्यात आली आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते कांकरिया यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, बाबासाहेब सानप, युवा मोर्चाचे अध्यक्ष रूद्रेश अंबाडे, देवेंद्र दुधाले, अॅड. देवेंद्र बंब आदी उपस्थित होते.

## पैसे देण्यास नकार दिल्याने रिक्षाचालकावर कोयत्याने हल्ला

नगर - चाँदनी चौक परिसरात रिक्षाचालकाकडे खर्चासाठी पैसे मागितले पण त्याने ते न दिल्याच्या रागातून आरोपीने लोखंडी कोयत्याने हल्ला करून जखमी केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अकबरअली कामरअली इराणी (वय ५६, रा. बाबा बंगाली, झेंडीगेट) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी ८ मे रोजी पहाटेच्या सुमारास चाँदनी चौक परिसरात असताना आरोपी जाहीद याने त्यांच्याकडे पैशांची मागणी केली. इराणी यांनी पैसे देण्यास नकार दिला असता, आरोपीने संतापून त्यांना अश्लील शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण सुरू केली. वाद इतका विकोपाला गेला की, आरोपीने आपल्याजवळील लोखंडी कोयत्याने फिर्यादीच्या डाव्या हाताच्या बोटावर वार केला. या हल्ल्यात फिर्यादी रक्तबंबाळ होऊन जखमी झाले आहेत.

केवळ मारहाण करूनच आरोपी थांबला नाही, तर त्याने फिर्यादीला वस्तऱ्याने कापून टाकण्याची धमकी दिली. या झटापटीत फिर्यादीच्या खिशातील ७५० रुपये गहाळ झाले आहेत. घटनेनंतर जखमींना तातडीने जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. याप्रकरणी गुन्हा नोंदवला असून, आरोपीचा शोध घेतला जात आहे. अधिक तपास पोलीस अंमलदार अहमद इनामदार करत आहेत.

# गोमांस विक्रीसाठी रिक्षातून वाहतूक करणाऱ्यांना पकडले

नगर - राज्यात बंदी असतानाही गोवंशीय जनावरांची कत्तल करुन गोमांसची विक्रीसाठी रिक्षातून वाहतूक करणाऱ्याला भिंगार कॅम्प पोलिसांच्या पथकाने पकडले आहे. ८ मे रोजी ही कारवाई करण्यात आली आहे.

याबाबत ची माहिती अशी की, सोमनाथ राजाराम चितळकर (रा. साकत ता.नगर) यांनी पोलिसांना माहिती दिली की, कॅन्टोन्मेट लॉन भिंगार येथे एक बजाज कंपनीची रिक्षा (क्र.एमएच १६ सीई ३४३४)ही मधुन गोवंशीय जनावरांची कत्तल करून गोमांस विक्री करणेकारीता गोमांसची वाहतुक केली जात आहे. ही माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर यांनी तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांना कारवाई करण्याचे आदेश दिले.

त्यानुसार पथकाने त्या ठिकाणी जावुन फुरकान इरफान शेख, अमीर अमिन शेख (दोन्ही रा. सदर बाजार, भिंगार), रेहान साजीद शेख (रा. खाटीक गल्ली, पाथर्डी), अरबाज कुरेशी (रा.कोठला, अहिल्यानगर) यांना ताब्यात घेतले. त्यांच्या कडून गोवंशीय जातीचे जनावरांचे ३०० किलो वजनाचे ९० हजार रुपये किमंतीचे गोमांस तसेच बजाज कंपनीची रिक्षा असा मुद्देमाल जप्त केला. त्यांच्या विरुद्ध भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात भा.न्या.सं.२०२३ चे कलाम २७१, ३२५.५. सी.९ ए प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई स.पो.नि. जगदीश मुलगीर यांचे मार्गदर्शनाखाली स.फौ. सतिष भांड, पो.हे.कॉ. नंदकुमार पठारे शाहीद शेख यांनी केली आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### रोगप्रतिकारक शक्ती वाढवा

आपल्या धावपळीच्या जीवनात आपण इतके व्यस्त होतो की आपली जीवनशैली गोंधळलेली बनते. त्याच वेळी, आपण सहजपणे योग्य खाणे देखील करू शकत नाही. या अनियमित जीवनशैली आणि सवयींचा आपल्या शरीरावर परिणाम होतो. त्यामुळे आपली रोगप्रतिकारक शक्ती देखील कमकुवत होते. शरीरात सर्व प्रकारचे पोषक तत्व असणे महत्वाचे आहे, परंतु त्यांच्या कमतरतेमुळे अनेक रोगांचा धोका वाढतो. व्हिटॅमिन सी, एक पोषक तत्व, तुमची रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्याचे काम करते. व्हिटॅमिन सीचे सेवन केल्याने हृदयाचे आरोग्य सुधारते. ते रक्तदाब नियंत्रित करते आणि हृदयरोगाचा धोका कमी करते. शिवाय, ते डोळ्यांच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे, कारण ते मोतीबिंदू आणि वयाशी संबंधित दृष्टी समस्या टाळण्यास मदत करते. व्हिटॅमिन सीचे सेवन करण्यासाठी नैसर्गिक स्रोतांची मदत घेऊ शकता. नैसर्गिक स्रोतांपैकी आवळा हा सर्वात श्रीमंत मानला जातो. याशिवाय संत्री, लिंबू, पेरू, किवी, स्ट्रॉबेरी, अननस, टोमॅटो, सिमला मिरची, ब्रोकोली आणि हिरव्या पालेभाज्या हे देखील त्याचे चांगले स्रोत आहेत.

## पाककला

### तडका कर्ड राईस

**साहित्य** शिजवलेला मऊ भात २ वाट्या (शिळा भातही चालेल), ताजे दही १.५ ते २ वाट्या (जास्त आंबट नसावे), मीठ चवीनुसार, कोथिंबीर बारीक चिरलेली, फोडणीसाठी (तडका), तेल किंवा तूप १ मोठा चमचा, मोहरी १ चमचा, जीरे आधा चमचा, कढीपत्ता ७-८ पाने, हिरवी मिरची २ (बारीक चिरलेली), आलं १/२ इंच (किसलेलं), हिंग चिमूटभर, डाळी (ऐच्छिक) उडीद डाळ आणि चणा डाळ प्रत्येकी १ चमचा (कुरकुरीतपणासाठी)

**कृती** भात तयार करणे एका मोठ्या बाऊलमध्ये शिजवलेला भात घ्या. भात गरम असेल तर तो पूर्णपणे थंड होऊ द्या. चमच्याने भात थोडा मॅश (मऊ) करून घ्या. आता भातात दही आणि चवीनुसार मीठ घालून व्यवस्थित एकत्र करा. एका लहान कढईत तेल किंवा तूप गरम करा. त्यात मोहरी, जीरे, उडीद डाळ आणि चणा डाळ घालून लालसर होईपर्यंत परता. त्यानंतर हिंग, कढीपत्ता, आल्याचे कीस आणि हिरवी मिरची टाकून फोडणी तडतडू द्या. एकत्रीकरण तयार झालेली ही गरमागरम फोडणी दही-भाताच्या मिश्रणावर ओता. सजावट वरून भरपूर ताजी कोथिंबीर घाला आणि सर्व नीट मिक्स करा.

## वास्तू

### स्वच्छ स्वयंपाकघर

* रात्रीच्या वेळी घर स्वच्छ असेल तर तिथे माता लक्ष्मी आणि अन्नपूर्णा देवीचा वास राहतो. अस्वच्छ किंवा खरकटी भांडी ठेवल्याने घरामध्ये 'दरिद्रता' येते आणि अन्नाची कमतरता भासू शकते, अशी मान्यता आहे.

* रात्रभर खरकटी भांडी किंवा उरलेले अन्न तसेच ठेवल्याने घरात नकारात्मक ऊर्जा वाढते. यामुळे घरातील सदस्यांमध्ये चिडचिड होणे, तणाव वाढणे किंवा आर्थिक प्रगतीत अडथळे येण्याची शक्यता असते असे वास्तु तज्ज्ञ मानतात. सकाळी उठल्यावर स्वच्छ स्वयंपाकघर दिसले की मन प्रसन्न राहते.

## सौंदर्य

जर तुम्ही रोज प्रवास करत असाल, तर तुमच्या बॅगमध्ये नेहमी थोडेसे हेअर सीरम किंवा लिव्ह-इन कंडिशनर ठेवा. यामुळे धुळीच्या किंवा दमट हवामानात केसांचा कुरळेपणा त्वरित नियंत्रणात येतो. तसेच, यामुळे तुमचे केस व्यवस्थित आणि मुलायम राहतात. शिवाय, हे केसांच्या कोरड्या टोकांचेही संरक्षण करते.

## सल्ला

पुदिन्याच्या पानांना वाळून हाताने त्याची पूड तयार करावी व ती पूड चाळणीने चाळून एका बरणीत भरून ठेवावी. या पुडेचा वापर फ्रूट चाट ची चव वाढवण्यासाठी करू शकता.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

रविवार, दि. १० मे २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, वैशाख कृष्णपक्ष, धनिष्ठा २४।५०, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. २९ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : अडकलेला पैसा मिळेल. गूढ अनुसंधान करणाऱ्यांसाठी शुभ. गैरसमज दूर होतील.

**वृषभ** : आपल्या विवेक बुद्धिच्या उलट काम झाल्याने हानि होऊ शकते. नियंत्रण ठेवा.

**मिथुन** : आपल्या प्रयत्नाने उन्नति कराल. धनलाभ होईल. वरिष्ठांची मर्जी राहील. आपल्या प्रयत्नांमुळे व्यापारात वृद्धि होईल.

**कर्क** : आपल्या यशाचा मूळ मंत्र कोणत्याच कामाला अशक्य न समजणे आहे. मित्रांचा सहयोग मिळेल.

**सिंह** : कामाला वाव मिळेल. आपले निर्णय, विचार दुसऱ्यांवर थोपू नका.

**कन्या** : लाभाच्या संधी. नवीन ओळखी संभवतात. आपल्या बुद्धि आणि तर्काने कार्यात यशाची शक्यता.

**तूळ** : संपत्तीच्या कामात यश मिळण्याचे योग. मनात नवीन कल्पना सुचतील.

**वृश्चिक** : आपल्या महत्वाकांक्षेमुळे यश मिळू शकेल.


**धनु** : व्यापारिक लाभ आणि सुख-समृद्धि वाढेल.

**मकर** : सामाजिक यश. नवीन कार्य सुरु करू नका. विरोधकांपासून दूर रहा. यश मिळणार नाही.

**कुंभ** : अनपेक्षित फायदा करून देणाऱ्या काही घटना घडतील. वेळेचे महत्व समजा. घरात मंगल कार्य होतील.

**मीन** : आर्थिक आणि सामाजिक कामांमुळे अडथळे. कामांची गती मंदावेल. शांत रहा. व्यापारात नवीन करार होतील.

## शब्दगंध क्र. ७४२६ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :** १) शंकर; महादेव; नीळकंठ ४) सांगाडा; सापळा ७) अगदी सहज; हसतखेळत (काम वगैरे करणे) ९) संयुक्तपणे केलेला विचार किंवा कट १०) करंजी वगैरेत भरले जाणारे मिश्रण; बाखर ११) वडिलांचे संबोधन १२) नुकसान; इजा; फिकीर; हानी १३) बडबड; कोमलता; चुरुचुरु १४) अट; परंतु; शर्त १५) केस; खडी १६) लहान मूल; लेकरू १७) गव्हाचे कणीदार पीठ १९) एक मराठी संत - ++++ महाराज २०) चिन्ह; खूण

**उभे शब्द :** १) चालू काळात; वर्तमान स्थितीत २) लोकांची मोजणी; जनगणना; खानेसुमारी ३) ओकारी; उलटी; वांती ४) भोजनास बसलेल्या अनेक लोकांची रांग ५) बस्तान ६) प्रवाहाचे आणलेली पाणी ८) तीन गुणांपैकी एक; अंधार ९) राखण; सुरक्षा; रखवाली ११) प्राथमिक शाळेतील मुलांसाठीचे मराठी भाषा पुस्तक १३) मुरड; उसण; चमक १४) पण १५) बाब; गोष्ट; रक्कम; लेखणी १६) एक समसंख्या; एका तपातील वर्षांची संख्या १८) धागा; तंतू

### शब्दगंध क्र. ७४२५ चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : समाधानातच खरी श्रीमंती असते सगळे प्राप्त करण्यात नाही.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### भारतातील कोणत्या शहराला 'टरबूज राजधानी' म्हटले जाते?

भारतात अनेक फळांचे उत्पादन घेतले जाते, प्रत्येक शहर त्याच्या विशेष एका फळासाठी प्रसिद्ध आहे. पण तुम्हाला माहित आहे का? महाराष्ट्रातील सोलापूर हे शहर त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण ओळखीमुळे टरबूज राजधानी म्हणून ओळखले जाते. येथील काळी माती आणि वैशिष्ट्यपूर्ण हवामानामुळे टरबूजांना नैसर्गिक गोडवा आणि उत्कृष्ट चव मिळते.

सोलापूर हे शहर त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण ओळखीमुळे भारताची टरबूज राजधानी म्हणून ओळखले जाते. येथील काळी माती आणि प्रखर सूर्यप्रकाशामुळे टरबूज इतके नैसर्गिकरित्या गोड आणि रसरशीत होतात की त्यांची चव परदेशातही प्रसिद्ध आहे. तसेच येथील माती आणि कमी आर्द्रता टरबूज उत्पादनासाठी विशेषतः अनुकूल आहे. येथील शेतकरी लाखो टन टरबूज पिकवतात, वेळेवर त्यांची काढणी करतात आणि देशभरातील बाजारपेठांमध्ये पाठवतात. तसेच सोलापूरमध्ये उन्हाळ्यात थंडगार कलिंगडाचा आस्वाद घेणे खरोखरच अविस्मरणीय ठरते.

## मन:शांती

एकदा भगवान विष्णूंनी ठरविले की, आज जो जे मागेल ते त्याला द्यायचे. सर्वांच्या इच्छा पूर्ण करावयाच्या. सर्व याचक एका ओळीत उभे राहून आपली पाळी आली की आपल्याला हवे ते मागून घेत होते. कोणी धन, कोणी संतान, कोणी स्वास्थ्य तर कोणी वैभव मागत होते.

विष्णू दोन्ही हातांनी भरभरून देत होते. लक्ष्मीने पाहिले की, हळूहळू विष्णूचे भांडार रिकामे होत चालले आहे. तेव्हा विष्णूचा हात धरत ती म्हणाली, अशा रीतीने देत राहिलात तर वैकुंठाचे सर्व वैभव काही क्षणातच नाहीसे होईल. मग आपण काय करायचे?

सस्मित चेहऱ्याने विष्णूंनी उत्तर दिले, 'तू अजिबात चिंता करू नकोस. मजजवळ अजून एक संपत्ती सुरक्षित आहे. ती मानव, गंधर्व, किन्नर या पैकी कोणीच अजून मागितलेली नाही. ती संपत्ती जोपर्यंत आपल्याजवळ आहे तोपर्यंत तू दुसरे काहीही द्यावे लागले तरी काळजी करू नकोस.' लक्ष्मीने विचारले,

'सांगा बघू अशी कोणती अजब गोष्ट आपल्याजवळ आहे. माझ्या तर काही लक्षात येत नाही.' विष्णू म्हणाले, 'तिचं नाव आहे शांती' जर मन:शांती नसेल तर विश्वातील सारी संपत्ती जरी माणसाला प्राप्त झाली तरी ती आपत्तीच ठरते. म्हणून मी शांती सांभाळून ठेवली आहे.

## जीवन का अमृत (भाग १)



स्वरूप से आमने-सामने होकर मिलता है और उससे बातें भी कर सकता हैं, जैसे हम आमतौर से इस संसार में करते हैं । अत: इस विज्ञान में, सच्चा ध्यान-अभ्यास तभी शुरू होता है, जब हम सतुगुरु से अंतर में आमने-सामने होकर मिलते हैं और उससे बातें करते हैं । यह सभी धर्मों का व्यावहारिक पक्ष है, ताकि हम इसी जिंदगी में निरोल प्रभु तक पहुँच सकें ।

***

### अध्यात्मिक उन्नती

३८. मैं प्यारे-और दूसरे रिश्तेदारों के प्रति आपकी भावनाओं की कद्र करता हूँ। उनकी भौतिक और आध्यात्मिक उन्नति के लिए आपका दयाभाव प्रशंसनीय है ।

दयालु गुरु-सत्ता अपने नामलेवाओं के रक्त-संबंधियों और नजदीकी रिश्तेदारों को बराबर का प्रेम, दया और संरक्षण देती है और आपकी प्यार भरी भावनाएँ उनमें से हर एक को पवित्र रास्ते पर लाने में सफल हो सकती है। आप हर एक को प्रेरित कर सकते हैं कि वे पवित्र शिक्षाओं के सिद्धांतों को समझें और साथ ही साथ अध्यात्मिक सुंदरता के उच्चतर मूल्यों को भी और जब वे सिद्धांतों को पूरी तरह समझ लें और भोजन में बताया गया परहेज रख सकें, तो वे पवित्र नामदान के लिए आवेदन कर सकते हैं।

उन्हें रास्ता दिखाने के लिए जरूरी इंतजाम कर दिया जाएगा। मुझे आपकी हाल की बीमारी पर खेद है, जो कि अब अतीत की बात

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### शांती आणि आनंद

सुरेश ओबेरॉय : हे अनैसर्गिक असलं तरी जगात हेच घडत असतं.

शिवानीदीदी : हो, पण प्रत्येक जण कमकुवत आहे म्हणून दुबळेपणा ही शक्ती आहे असं आपण नाही म्हणू शकत. आजूबाजूचा प्रत्येक जण आजारी आहे म्हणून शारीरिक स्वास्थ्याचं वर्णन आपण आजारपण असं नाही करू शकत. जर प्रत्येक जण दुःखात असेल तर हे नॉर्मल आहे असं आपण नाही म्हणू शकत..

सुरेश ओबेरॉय : हो, एखाद्या रोगाची साथ आली तर ती सामान्य आहे असं आपण नाही म्हणू शकत.

शिवानीदीदी: साथ पसरली आहे आणि त्यावर इलाज करू शकतो, असं आपण म्हणालो तर ठीक आहे. पण आपण त्या आजारालाच स्वाभाविक किंवा नैसर्गिक मानलं, तर आपण त्याला स्वीकारार्ह बनवतो, मग त्याला योग्य म्हणतो आणि शेवटी तो आजार वाढत जातो. आधी आपण ताणतणावाला नैसर्गिक म्हटलं, त्यानंतर संतापाला आणि नंतर रक्तदाबालाही सामान्य मानू लागलो. कारण आजकाल हे सामान्य, कॉमन आहे. मधुमेह, नैराश्य आणि अगदी घटस्फोटाचं वाढतं प्रमाण यांनाही आपण स्वाभाविक म्हणतो. आपली मूलं व्यसनांकडे आकर्षित व्हायला लागली तेव्हा आजकाल मुलांसाठी हे स्वाभाविक आहे असं म्हणालो. आणि दुसरीकडे, शांती आणि आनंद हे आपले मूळ गुण असूनही आपण ते बाहेरच्या जगात शोधू लागलो. (क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

मुलगा : आई मी अभ्यास करता करता टिव्ही बघू का?
आई : बघ पण चालू नको करूस

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* मेट्रो ट्रेन सेवा देणारा भारत हा जगातील कितव्या क्रमांकाचा देश आहे? - तिसऱ्या

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## साहित्य सहवास - 'हात, डोळे आणि मन'

दोन्हीही हात जोडले, दोन्हीही डोळे झाकुन घेतले की मनात प्रकट होणारे विचार शंभर टक्के सकारात्मक असलेच पाहिजेत. मंदिरात गेल्यानंतर आपण दोन्ही डोळे बंद करतो, दोन्हीही हात जोडतो, मनोभावे परमेश्वराला नमस्कार करतो आणि मला सुखात-आनंदात ठेव, मला दुःखात ठेऊ नकोस' असं म्हणतो. पण काही व्यक्ती मनापासून, मंदिरात, मनोभावे नमस्कार करतांना म्हणतात - 'मला दुःख दे आणि ते दुःख सहन करण्याची शक्ती दे.' थोडक्यात असं म्हणता येईल की प्रार्थना व्यक्तीपरत्वे बदलु शकते. एखाद्या दिवशी, संपुर्ण दिवसभर कोणत्याही एकाच हाताने कामं करा, कामं करणं शक्य होतय का पाहा. कोणत्याही एखाद्या दिवशी एक डोळा बंद ठेऊनच दिवसभरातली कामं करा. जवळपास ह्या प्रकारे कामं करणं शक्य होणार नाही अथवा कामं करण्याची गती अत्यंत कमी असेल तेव्हा आपल्याला त्या दुसऱ्या हाताचं, दुसऱ्या डोळ्याचं महत्व नक्कीच लक्षात येईल, यायलाच पाहिजे. खरं तर आपलं संपुर्ण शरिर अमूल्य आहे. हा मनुष्यजन्मच अमूल्य आहे. दोन्हीही हात नाहीत त्यांचा कधी विचार केलात का ? दोन्हीही डोळे नाहीत त्यांचा कधी विचार केलात का ? दोन्ही हात नाहीत आणि दोन्हीही डोळे नाहीत अशांचा विचार कधी केलात का? अनेकांनी हा विचार कधीच केलेला नसणार. पण एकदा दोन्हीही डोळे झाकुन दोन किलोमीटर चालत जा. दोन्हीही हात नाहीत असं समजुन पाणी कसं पिणार, जेवण कसं करणार ह्याचं प्रात्यक्षिक करुन तर पाहा. म्हणजेच आपल्याकडे जे विनामुल्य आहे त्याचं महत्व आपल्याला नसतंच, हे वास्तव स्वीकारा. दिवसभरात मनात अनेक विचार येतात. चांगले विचार तसेच वाईट विचारही येतात. हे विचार कुठेच दिसत नाहीत, मनसुध्दा दिसत नाही. मला वाटतं मनाइतकं चंचल आणि ताकदवान काहीच नसावं, नसेल. मनाने हळवी, मनाने खंबीर व्यक्ती मी आणि तुम्हीसुध्दा पाहिल्या आहेत. मनाने खंबीर असेलल्यांकडून बरंच काही शिकलंच पाहिजे. अशा अनेक व्यक्ती पाहिल्यात ज्या हातालाच परमेश्वर मानतात. अपना हाथ जगन्नाथ म्हणतात हे अगदी खरं आहे. मनगट, तळहात, बोटं, ढोपर, दंड.... खांद्यापर्यंतचा हा हात योग्य, चांगलं कर्म करण्यासाठी वापरलाच पाहिजे. दुसऱ्यांचे जोडे उचलण्यासाठी हातांचा वापर करणार असाल तर वाईटच. दोन्हीही हातांनी भविष्य उज्वल करणाऱ्या अनेक व्यक्ती मी पाहिल्या आहेत. ज्यामुळे आपल्याला दिसतं ते डोळेसुध्दा आपल्या जडणघडणीत मोलाची भूमिका बजावतात. ह्या दोन्हीही डोळ्यांनी चांगलं पाहिलं, चांगलं वाचलं तर भविष्य नक्कीच उज्वल होणार आहे. संपूर्ण विश्व सामावण्याची ताकद डोळ्यांमध्ये आहे. इतरांच्या डोळ्यांतले भाव वाचण्याचा प्रयत्न कराच. म्हणजेच डोळ्यांचा योग्य, चांगला उपयोग केला असं म्हणता येईल. ज्या डोळ्यांनी सौंदर्य टिपतो त्या डोळ्यांचं सौंदर्य जपण्याचं काम आपलंच आहे. लहानग्यांच्या डोळ्यांतले निरागस भाव कधी पाहिलेत का? कडकडुन भुक लागलेल्या व्यक्तीचे डोळे कधी पाहिलेत का ? आनंदाश्रु भरलेले डोळे कधी पाहिलेत का ? माझ्या भेटीमुळे कुणाच्या तरी डोळ्यांतला आनंद कधी पाहिलाय का? चांगलं काय आणि वाईट काय हे कळत असुनही वाईट कृती करणाराचे भित्रे डोळे कधी पाहिलेत का ? तळ हातावरच्या रेषांकडे पाहात स्वतःच्या नशिबाला दोष देणारांचे डोळे कधी पाहिलेत का ? कृतार्थतेचा भाव असलेले डोळे पाहिलेत का? ह्या सुंदरशा डोळ्यांनी निसर्ग पाहता पण झाडाचं रोप लावुन, त्याला मायेनं खत पाणी कधी दिलंय का? दोन्ही हात जोडुन निसर्गाचे आभार मानल्याचं आठवतंय का? मनातले हे सगळे भाव डोळ्यांत दिसतात. डोळ्यातले भाव वाचता येतात म्हणजेच तुम्हाला मनही वाचता येतं. प्रचंड चंचल असणारं हे मन स्थिर करण्यासाठी ध्यान करणं, दोन्हीही डोळे मिटवुन घेऊन स्वतःमध्ये जाणं अत्यंत महत्वाचं आहे. हात, डोळे, मनाचे आभार मानतांना संपूर्ण शरिराचे मनापासून आभार मानाच. ज्यांना दोन्हीही अथवा एक हात नाही, ज्यांना एक अथवा दोन्हीही डोळे नाहीत त्यांच्या मनाचा गांभिर्याने विचार करा. स्वतःला त्यांच्या जागेवर ठेऊन, त्रयस्थ होऊन विचार करा. अनेक प्रश्नांची उत्तरं मिळतीलच शिवाय हात, डोळे, मनाचं अमूल्यत्व समजेल. एकदा स्वतःला एकच प्रश्न विचारा - ' माझ्या डोळ्यांचा, हातांचा आणि मनाचा योग्य, चांगला असा उपयोग मी करतो का? तुमचं मन तुम्हाला नक्कीच उत्तर देईल. समजा तुमच्या मनाने उत्तर दिलं की तु, तुझ्या डोळ्यांचा, हातांचा, मनाचा चांगला, योग्य उपयोग करतोस तर तेच कार्य अखेरच्या श्वासापर्यंत चालु ठेवा. आणि समजा तुमच्या मनाने उत्तर दिलं की तु, तुझ्या डोळ्यांचा, हातांचा, मनाचा योग्य, चांगला उपयोग करत नाहीस तर लगेच चांगलं पाहा, वाचा, चांगली कृती करा, मनात सकारात्मक विचारांना कायमस्वरुपी घर करु द्या. त्या सकारात्मक विचारांनुसार सकारात्मक कृती करा. मनुष्यजन्म सार्थकी लागेल. (लेख क्र.६००)

**- सुनील राऊत**
माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर
मो.९८२२७५८३८३

## आहारवेद - आरोग्य संवर्धन

### 'अ' जीवनसत्त्व

अशाप्रकारे शरीराची जडणघडण, बांधणी या सर्व भाज्यांवर अवलंबून असते. आयुर्वेदामध्ये अनेक ठिकाणी वेगवेगळ्या पालेभाज्या, कंदमुळे यांचे गुण, रोग दूर करण्याची त्यांच्यामध्ये असणारी क्षमता, आहारामध्ये असणारे त्यांचे महत्त्व यांचे वर्णन अनेक ठिकाणी केले आहे.

जीवनसत्त्वे : शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढून विविध जंतूंपासून रक्षण करण्यासाठी जीवनसत्त्वांची आवश्यकता असते. विविध त्वचारोगांपासून श्वासमार्गाच्या रोगांपर्यंत संरक्षण करण्यासाठी, तसेच अनेक प्रकारच्या ॲलर्जीपासून शरीराचे रक्षण करण्यासाठी जीवनसत्त्वांची आवश्यकता असते. अनेक भाज्यांमध्ये कॅरोटीन नावाचे द्रव्य असते. या द्रवामुळे 'अ' जीवनसत्त्व तयार होते. याचा उपयोग शरीराची ऊर्जा व उत्साह वाढविण्यासाठी होतो. तसेच डोळ्यांची दृष्टी सुधारणे, त्वचा कांतियुक्त राहणे, रोगप्रतिकारक शक्ती

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# पेमराज सारडा महाविद्यालयातील कृष्णा शिंदे यांची युरोपमधील लूट युनिव्हर्सिटीमध्ये पीएच.डी.साठी निवड



नगर – येथील हिंदसेवा मंडळ संचलित पेमराज सारडा महाविद्यालयचे माजी विद्यार्थी कृष्णा संतराम शिंदे यांची युरोपमधील लूट युनिव्हर्सिटी येथे पीएच. डी. अभ्यासक्रमासाठी तसेच ज्युनियर रिसर्चर पदासाठी निवड झाली आहे.

कृष्णा शिंदे यांनी सन २०२३ मध्ये पेमराज सारडा महाविद्यालयातून रसायनशास्त्र विषयात बी.एससी. पदवी उत्कृष्ट गुणवत्तेसह पूर्ण केली. त्यांच्या बी.एससी. शिक्षणकाळात रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ.रत्ना वाघमारे यांनी त्यांना सातत्याने मार्गदर्शन केले. शैक्षणिक प्रगती, संशोधनाची आवड आणि करिअरविषयक दिशा यांसह विविध बाबींमध्ये त्यांनी कृष्णा यांना सहकार्य केले. त्यांच्या प्रेरणा आणि मार्गदर्शनामुळेच कृष्णा यांची संशोधन क्षेत्रातील आवड अधिक दृढ झाली.

त्यानंतर त्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मधून भौतिक रसायनशास्त्र या विषयात एम.एससी. पूर्ण केले. त्यांच्या पदव्युत्तर शिक्षणाचा केंद्रबिंदू फंक्शनल पॉलिमर्स आणि ॲडव्हान्स्ड मटेरियल्स हा होता.

शिक्षणादरम्यान त्यांनी स्पेक्ट्रोस्कोपी, इलेक्ट्रोकेमिस्ट्री आणि सॉलिड स्टेट केमिस्ट्री या विषयांमध्ये भक्कम पायाभूत ज्ञान संपादन केले. त्यांचा संशोधन प्रबंध फंक्शनल पॉलिमर्सवर आधारित असून, त्यांनी मॉलिक्युलरली इम्प्रिंटेड पॉलिमर्स या विषयावर विशेषतः सिलेक्टिव्ह रिकग्निशन ॲप्लिकेशन्ससाठी संशोधन कार्य केले आहे.

तसेच त्यांनी MIT World Peace युनिव्हर्सिटी येथे प्रोजेक्ट असिस्टंट म्हणून कार्य करताना मटेरियल सिंथेसिस आणि विविध कॅरेक्टरायझेशन तंत्रज्ञानामध्ये प्रत्यक्ष संशोधनाचा अनुभव मिळवला. या कालावधीत त्यांनी आपले मार्गदर्शक डॉ. सुधीर कुमार शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली एक भारतीय पेटंट प्रकाशित केले तसेच RSC Applied Polymers या आंतरराष्ट्रीय संशोधन नियतकालिकामध्ये संशोधन लेख प्रकाशित केला. ही उपलब्धी त्यांच्या संशोधनक्षमता आणि वैज्ञानिक योगदानाचे द्योतक मानली जात आहे.

पीएच. डी.प्रवेश प्रक्रियेसाठी एकूण २८५ उमेदवारांनी अर्ज केले होते. त्यापैकी काही निवडक उमेदवारांना मुलाखतीसाठी आमंत्रित करण्यात आले होते. अत्यंत स्पर्धात्मक प्रक्रियेतून कृष्णा शिंदे यांनी यश मिळवत अंतिम निवड प्राप्त केली. मुलाखतीदरम्यान त्यांनी आपल्या शैक्षणिक वाटचालीबरोबरच संशोधन अनुभव, फंक्शनल पॉलिमर्स, मॉलिक्युलरली इम्प्रिंटेड पॉलिमर्स आणि प्रयोगशाळेतील प्रत्यक्ष कामाचा अनुभव प्रभावीपणे सादर केला. तसेच लूट युनिव्हर्सिटी मधील संशोधन वातावरणात योगदान देण्याची आपली तयारी आणि संशोधनाविषयीची दृष्टी त्यांनी स्पष्ट केली. विशेष म्हणजे, त्यांची लूट युनिव्हर्सिटी मध्ये जूनियर रिसर्चर म्हणूनही नियुक्ती झाली असून, त्यांना दरमहा सुमारे रु. २.८ ते रु. ३ लाख इतके मानधन मिळणार आहे. ही उपलब्धी त्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन कौशल्य आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्षमतेची साक्ष देणारी आहे.

२८५ विद्यार्थ्यांच्या अर्जदारांमधून अंतिम निवड होणे हा त्यांच्या शैक्षणिक आणि संशोधन प्रवासातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा असून, ही उपलब्धी महाविद्यालयासाठी अभिमानास्पद आहे.

कृष्णा शिंदे हे ११ मे रोजी पुढील शिक्षणासाठी फिनलंडला रवाना होणार असून, तेथे लूट युनिव्हर्सिटी मध्ये पीएच. डी.अभ्यासासोबत फंक्शनल मटेरियल्स आणि प्रगत संशोधन क्षेत्रात कार्य करणार आहेत. रसायनशास्त्राचा उपयोग करून पर्यावरणीय निरीक्षण, सेन्सर तंत्रज्ञान आणि प्रगत मटेरियल डिझाइन यांसारख्या क्षेत्रांमध्ये नाविन्यपूर्ण संशोधन करण्याची त्यांची विशेष इच्छा आहे.

# प्रेरणादायी अक्षरधन

## सामान्य माणसाला हवी सविकल्प समाधी







ज्ञानेश्वर माऊलींनी समाधी हे साधन म्हणून सांगितले आहे. समाधी ही संजीवन आहे. संजीवन म्हणजे कामात प्राण ओतणारी आहे. काम करणाऱ्याला चैतन्य, स्फूर्ती, उत्साह व तत्परता देणारी आहे. शम म्हणजे मनोनिग्रह, दम म्हणजे इंदियनिग्रह, चातुर्य म्हणजे भानासहित विज्ञान अंगी बाणवणारी आहे. समाधी साधली की ती अज्ञानाला बाधलीच समजा. पुन्हा अडाण्यासारखी कृती वा विचार माणूस करणारच नाही.

सैरावैरा धावणारे मन कामात लागणे, ही व्यवहारातील समाधीची फार मोठी उपयुक्तता.

सम्यक अधीयते अनेन सा समाधिः ।

कोणतेही काम ज्यामुळे चांगल्या प्रकारे साधते, त्याला समाधी म्हणायचे. समाधी दोन प्रकारची आहे. सविकल्प व निर्विकल्प, चित्र एकाग्र केले असता बाह्य वस्तूंचे काही भान राखणे, ही सविकल्प समाधी आणि बाह्य गोष्टींचे मुळीही भान नसणे ही निर्विकल्प. निर्विकल्प समाधी योग्यासाठी. योग्य व्यवहार साधणाऱ्या सामान्य माणसासाठी हवी सविकल्प समाधी. व्यवहारात निर्विकल्प समाधीमुळे आपत्ती ओढवू शकते. माणूस अव्यवहारी व कुचेष्टेचा विषय होऊन शकतो. व्यवहारात अशी समाधी लावणारा अडाणी म्हणून देखील संबोधिला जाऊ शकतो.

एक डॉक्टर होते. मन लावून रोगी तपासायचे. चांगला डॉक्टर म्हणून गर्दी खूप रोग्यांची. रोग्याला तपासताना डॉक्टरांना सभोवारच्या व्यवहारांचे भान राहिना. एकदा एक जण धावत आला व म्हणाला, डॉक्टर वडिलांची प्रकृती एकाएकी खूप बिघडली आहे. लवकरच चला आमच्या घरी.

डॉक्टर रोगी तपासत होते. आवाज त्यांच्या कानी पडला; पण उमगला नाही. ते म्हणाले, तुम्ही व्हा पुढे; मी आलोच. काही काळजी करू नका.' तो गेला; पण पुन्हा काही वेळाने धावत आला. म्हणाला, डॉक्टर वडील डोळे फिरवायला लागलेत. लवकर चला.'

डॉक्टर रोगी तपासत होते; पुन्हा म्हणाले, तुम्ही व्हा पुढे; मी आलोच. काही काळजी करू नका.

तो पुन्हा काही क्षणांतच परतला. म्हणाला, डॉक्टर वडील गेले. डॉक्टर रोगी तपासत होते. पुन्हा म्हणाले, तुम्ही व्हा पुढे; मी आलोच. काही काळजी करू नका.

सभोवारचे सम्यक ज्ञान व भान राखूनच समाधी लागली पाहिजे. हीच कला आहे. ज्ञानेश्वर माउली हेच चातुर्य समाधीत अपेक्षिते.

म्हणूनच 'संताचा उपदेश व्यवहार्य नसतो.' असे म्हणणाऱ्यांनी तो नीट समजून घेतलेला नसतो, असे जाणवते. मनाची शांत वृत्ती आणि सर्वांप्रती पक्षपातविरहित दया, ही समाधीची अंगे सांगणारी माउली सामान्य जनतेला यशस्वी व्यवहाराची गुरुकिल्लीच देऊन जाते.

**– किशोर गांधी**

# शिक्षणशास्त्र विषयात राहुल गायकवाड यांना पीएच.डी. प्रदान



नगर – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या वतीने येथील राहुल रतन गायकवाड यांना शिक्षणशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या संशोधन कार्यासाठी डॉ. गायत्री गोरक्षनाथ चौकडे आणि प्रा. संजीव सोनावणे यांचे मार्गदर्शन लाभले.

संशोधन कार्यादरम्यान मार्गदर्शक आणि संशोधक यांना नॉर्वे आणि फिनलंड या देशांमध्ये अभ्यास व शैक्षणिक निरीक्षण करण्याची संधी मिळाली. आंतरराष्ट्रीय शैक्षणिक अनुभवामुळे त्यांच्या संशोधनाला अधिक व्यापक दृष्टी प्राप्त झाली. बदलत्या शैक्षणिक परिस्थितीत आणि नवीन आव्हानांना सामोरे जाण्यासाठी हे संशोधन उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



एसएससी परिक्षेत उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या म्हस्के विद्यालयातील विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

# म्हस्के विद्यालयाचा एस.एस.सी. परीक्षेचा ९१.२२% निकाल

नगर – जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगांव–ने संचलित काकासाहेब म्हस्के माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नागापूर आहिल्यानगर या विद्यालयाने फेब्रुवारी / मार्च २०२६ च्या माध्यमिक प्रमाणपत्र (एस.एस.सी.) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत निकालाची उज्वल परंपरा कायम राखली आहे. यंदा विद्यालयाचा एकूण निकाल ९१०२२ टक्के लागला आहे.

या परीक्षेसाठी एकूण ११४विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी १०४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, विशेष योग्यता श्रेणी १५, प्रथम श्रेणीत २२, द्वितीय श्रेणीत ४७,तर तृतीय श्रेणीत १० विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. प्रथम क्रमांक चैतन्य थोरात ९३.६०%, द्वितीय क्रमांक अपूर्वा नारखेडे ९२.४०%, तृतीय क्रमांक आदित्य काळे व अंजली बडे ८८.४०% गुण मिळवून विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे तसेच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र घुले पा., चंद्रशेखर घुले पा., जि.प. अध्यक्षा सौ. राजश्रीताई घुले पा., पं. स. सभापती डॉ. क्षितिज घुले पा., संस्थेचे प्रशासकीय अधिकारी के. वाय. नजन, संस्था समन्वयक विजय काशिद, प्राचार्या सौ. शितल बांगर तसेच प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. सुनंदा धामणे यांनी अभिनंदन केले.

# केडगावच्या महाराणी ताराबाई कन्या विद्यालयाची यशोगाथा कायम

## सलग २२ वर्षे १००% निकालाचा विक्रम अबाधित, स्वराली गवारे प्रथम



दहावी परीक्षेचा उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या महाराणी ताराबाई कन्या विद्यालयाच्या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

केडगाव – येथील महाराणी ताराबाई कन्या विद्यालयाने सलग २२ व्या वर्षी १०० टक्के निकालाची गौरवशाली परंपरा कायम राखत यंदाही उत्कृष्ट यश संपादन केले आहे. विद्यालयाच्या दहावी परीक्षेचा निकाल अत्यंत उज्वल लागला असून विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश मिळवत विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा अधिक भक्कम केली आहे.

यावर्षी विद्यालयातून एकूण ११५ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या असून त्यामध्ये ७६ विद्यार्थिनींनी विशेष प्रावीण्य प्राप्त केले आहे. तसेच ३२ विद्यार्थिनी प्रथम श्रेणीत तर ७ विद्यार्थिनी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाल्या आहेत. विद्यालयातील कुमारी स्वराली गवारे हिने ९७.८० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. कुमारी हिना शेख हिने ९६.६० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला, तर कुमारी जिया निनारीया हिने ९४.४६ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक संपादन केला. विशेष म्हणजे ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या एकूण १४ विद्यार्थिनी आहेत.

या यशाबद्दल संस्थेचे सचिव बबन कोतकर, सहसचिव रावसाहेब सातपुते, अध्यक्ष रमेश गवळी, उपाध्यक्ष भास्कर जासूद, खजिनदार प्रल्हाद साठे, संचालक डॉ. सुभाष बागले, जयद्रथ खाकाळ, दगडू साळवे तसेच संस्थेच्या संचालक मंडळाने यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक संजय निक्रड, जयश्री कोतकर, विद्यालयाच्या प्राचार्या वासंती धुमाळ तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थिनींचे कौतुक करत त्यांच्या यशामागील परिश्रमांचे अभिनंदन केले.

# ज्ञानसंपदा शाळेची शंभर टक्के निकालाची परंपरा कायम

## विद्यार्थ्यांनी मिळवले घवघवीत यश

सन २०२५ – २६ या शैक्षणिक वर्षातील एस.एस.सी. बोर्ड परीक्षेत तपोवन रोडवरील ज्ञानसंपदा शाळेने शंभर टक्के निकालाची उज्वल परंपरा कायम राखत घवघवीत यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांच्या या उत्तुंग यशामागे संस्थेचे विश्वस्त, मुख्याध्यापिका, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालक वर्ग यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यामुळे शंभर टक्के निकालाची परंपरा अखंडित राहिली आहे.



ज्ञानसंपदा शाळेची शंभर टक्के निकालाची उज्वल परंपरा कायम राखत विद्यार्थ्यांनी यश मिळवले. (छाया – उदय जोशी)

या वर्षीच्या निकालात गायकवाड ध्रुव याने ९७.८% गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. विशेष म्हणजे त्याने गणित व विज्ञान विषयात प्रत्येकी १०० पैकी १०० गुण मिळवले. वेदांत बर्वे याने ९६.२% गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळवला. ऋषभ वांडेकर याने ९६.००% गुणांसह तृतीय क्रमांक, तर नंदिनी खळेकर हिने ९५.६% गुण मिळवत चौथा क्रमांक पटकावला. भार्गवी परदेशी हिने ९५.४% गुणांसह पाचवा क्रमांक मिळवला.

यावर्षी एकूण ७९ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी ९०% पेक्षा अधिक गुण मिळवणारे २४ विद्यार्थी पात्र ठरले. तसेच ८० ते ८९ टक्क्यांच्या दरम्यान ३६ विद्यार्थी, ७० ते ७९ टक्क्यांच्या दरम्यान १४ विद्यार्थी आणि ६० ते ६९ टक्क्यांच्या दरम्यान पाच विद्यार्थी पात्र ठरले.

शाळेच्या सरासरी गुणांच्या टक्केवारीतही यंदा वाढ झाली असून ती ८५% पर्यंत पोहोचली आहे.

विषयनिहाय सरासरी पुढीलप्रमाणे : मराठी – ७८.२०%, इंग्रजी – ८३.४%, हिंदी/संस्कृत – ८५.१%, गणित – ८२%, विज्ञान – ८४.६%, सामाजिक शास्त्र – ८३.५%

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रवीण बजाज, उपाध्यक्ष मिलिंद गंधे, मानद सचिव अरुण कुलकर्णी, खजिनदार अविनाश बोपर्डीकर, स्कूल कमिटी चेअरमन कारभारी भिंगारे, श्रीहरी टिपूगडे, सुमित सोनवणे, विनोद बजाज, अक्षय वाघमोडे, शैक्षणिक सल्लागार डॉ. सुनिता भागवत तसेच मुख्याध्यापिका सौ. शिवांजली अकोलकर यांनी यशस्वी विद्यार्थी, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व पालकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# प्रगत माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयाचा दहावीचा निकाल ८९.०४ टक्के



निधी इप्पलपेल्ली



ममता चौधरी



वैभवी चोथे

नगर – दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या प्रगत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा शालांत बोर्ड परीक्षा (इयत्ता १० वी) फेब्रुवारी / मार्च २०२६ चा निकाल ८९.०४ टक्के लागला असून विद्यालयाच्या यशस्वी परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.

या परीक्षेत विद्यालयातून कु. निधी अविनाश इप्पलपेल्ली हिने ८३.२० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. कु. ममता नवराम चौधरी हिने ८०.२० टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळवला, तर कु. वैष्णवी पांडुरंग चोथे हिने ७४ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळवून विद्यालयाचे नाव उज्वल केले. याशिवाय इतर अनेक विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय यश संपादन करत विद्यालयाच्या निकालात भर घातली आहे.

या यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या अध्यक्षा सौ. विजया चंद्रकांत रेखे, सचिव किरण वैकर, उपाध्यक्ष चंद्रशेखर कुलकर्णी, खजिनदार उमेश चंद्रकांत रेखे, माजी अध्यक्ष दि. ना. जोशी, कार्यकारी सदस्य महेश चंद्रकांत रेखे, उदयकुमार भणगे, उमेश नगरकर तसेच विद्यालयाचे प्राचार्य सुनिल पंडित यांनी अभिनंदन केले. तसेच संस्थेचे सर्व विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनीही विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

विद्यालयाच्या या यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत, पालकांचे सहकार्य आणि शिक्षकांचे मार्गदर्शन हे प्रमुख घटक असल्याचे प्राचार्य सुनिल पंडित यांनी सांगितले. पुढील काळातही अधिक गुणवंत विद्यार्थी घडवण्याचा संकल्प संस्थेने व्यक्त केला आहे.

# लिटील वंडर्स स्कूलचे उत्तुंग यश

## सलग १२ वर्ष SSC च्या १००% निकालाची परंपरा कायम



सायली वाघ



जिज्ञासा वाघ



पायल शिकारे

नगर – शांतिनिकेतन फौंडेशनचे लिटील वंडर्स स्कूल व विजडम हायस्कूल जेऊर (बा.) ता. नगर, जि. अहिल्यानगर, या शाळेच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये सलग बाराव्या वर्षीही माध्यमिक शालांत परीक्षामध्ये शंभर टक्के निकालाची उत्तुंग परंपरा कायम ठेवत घवघवीत यश संपादन केले.

या वर्षी शाळेची विद्यार्थिनी कु. सायली संजय वाघ हिने ८७.२०% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला तर कु. जिज्ञासा अमोल वाघ हिने ८१.२०% गुण मिळवून द्वितीय तर कु. पायल कानिफनाथ शिकारे हिने ८०.००% गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला व इतर सर्व विद्यार्थ्यांनीही ६०% पेक्षा जास्त गुण मिळवून शाळेचा नावलौकिक कायम राखला.

आमच्या विद्यालयात प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष देवून अभ्यास करवून घेतला जातो त्यामुळेच शाळेव्यतिरिक्त बाहेरचे कोणतेही महागडे कोचिंग क्लासेस लावायची गरज पडत नाही. म्हणूनच सलग बारा वर्ष १००% निकाल देणारे आमच्या पंचक्रोशीतील हे एकमेव विद्यालय आहे, अशी माहिती शाळेच्या संचालिका सौ. स्वाती चेमटे यांनी दिली.

यासाठी शाळेच्या शिक्षिका सौ. कल्पना वड्डेपल्ली, सौ. आयेशा सय्यद यांनी विशेष परिश्रम घेतल्याची माहिती शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती चंद्रमौळी श्री धात्री यांनी दिली.

या विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे, जि. प. माजी सभापती बाजीराव पाटील गवारे, सरपंच सौ. ज्योती तोडमल, उपसरपंच सौ. अनिता बनकर, माजी सरपंच विकास कोथिंबीरे व मधुकरराव मगर तसेच पंचक्रोशीतील सर्व पालकांनी अभिनंदन केले आहे.

## नय्यर माध्यमिक विद्यालयाची उज्वल यशाची परंपरा कायम

नगर – श्रीमान बिशंभरदास अमरचंद नय्यर माध्यमिक विद्यालयाचा इ.१० वीचा निकाल ९८.७१ टक्के लागला. त्यामध्ये विशेष गुणवत्तेमध्ये ३८ विद्यार्थी, प्रथम श्रेणीत २१ व द्वितीय श्रेणीत १७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विद्यालयात शेख हसन मन्सुर ९५ टक्के गुण मिळवून प्रथम आला. मगर हर्षल प्रमोद ९३.६० टक्के घेत द्वितीय व कु. पालवे रोहिणी अनिल ९०.४० टक्के गुण घेऊन तृतीय आली.

यशस्वी विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक श्रीकृष्ण पवार, संस्थेचे अध्यक्ष काकासाहेब नय्यर, उपाध्यक्ष भाऊराव आंधळे, सचिव बाळासाहेब पवार, खजिनदार भास्करराव गोरे, अशोकराव बारस्कर, तानाजी काकड, सातपुते दामोदर, विनायक लिपणे यांनी अभिनंदन केले.

# श्री समर्थ विद्या मंदिर प्रशालेचा दहावीचा निकाल शंभर टक्के

## २३२ पैकी २३२ विद्यार्थी उत्तीर्ण



श्रावणी दळवी मंजुषा बोरकर ईश्वरी पवार

नगर – सावेडी येथील श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला, माध्यमिक विभाग यांनी सन २०२५–२६ च्या इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेत शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखत दैदीप्यमान यश संपादन केले आहे. परीक्षेसाठी प्रविष्ट झालेल्या सर्व २३२ विद्यार्थ्यांनी यश मिळवत विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

यंदाच्या निकालामध्ये विद्यालयातील १२२ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य (डिस्टिंक्शन) मिळवले असून ६५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. तसेच ३६ विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणी तर ९ विद्यार्थ्यांनी पास क्लासमध्ये यश संपादन केले आहे.

विद्यालयाच्या गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये कु. श्रावणी गणेश दळवी हिने ९७.८० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. कु. मंजुषा महेश बोरकर हिने ९६.८० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला, तर कु. ईश्वरी सुनील पवार हिने ९६.६० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला.

विद्यालयाच्या प्राचार्या सौ. वसुधा सुनील जोशी यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देत वर्षभर विविध उपक्रम, सराव परीक्षा, शैक्षणिक नियोजन आणि वैयक्तिक मार्गदर्शन यावर विशेष भर दिला. प्रत्येक विद्यार्थ्याकडे व्यक्तिगत लक्ष देत त्यांच्या गुणवत्तेनुसार अभ्यासाचे नियोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढविण्यासाठी वेळोवेळी प्रेरणादायी मार्गदर्शन करण्यात आले. यश हे केवळ गुणांपुरते मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासातही असते, अशी भूमिका त्यांनी सातत्याने विद्यार्थ्यांसमोर मांडली. त्यांच्या सकारात्मक नेतृत्वामुळे शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये उत्साह निर्माण होऊन विद्यालयाने शंभर टक्के निकालाची उज्वल कामगिरी नोंदवली.

विद्यालयाचे पर्यवेक्षक लक्ष्मीकांत कुलकर्णी यांनी संपूर्ण शैक्षणिक वर्षभर अभ्यासाचे काटेकोर नियोजन केले. विषयानुसार विशेष मार्गदर्शन वर्ग, नियमित चाचण्या, उत्तरपत्रिका विश्लेषण, गुणवृद्धी उपक्रम आणि विद्यार्थ्यांच्या शंकानिरसनासाठी स्वतंत्र सत्रांचे आयोजन करण्यात आले. प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्रगतीचा सातत्याने आढावा घेत विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी प्रेरित करण्यात आले. शिक्षकांमध्ये समन्वय राखून विद्यार्थ्यांना सर्वोत्तम शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्यात त्यांच्या नियोजनाचा मोठा वाटा राहिला. त्यांच्या शिस्तबद्ध कार्यपद्धतीमुळे विद्यालयाचा निकाल अधिक उज्वल ठरल्याची भावना शिक्षक व पालकांनी व्यक्त केली.


या यशाबद्दल श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळ, अहिल्यानगर येथील पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे आणि पालकांचे अभिनंदन केले. कार्यकारीणी सदस्य तथा शालेय समिती चेअरमन अड. किशोर देशपांडे, श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे सेक्रेटरी प्र. स. ओहोळ, सुरेश क्षीरसागर, मंडळाचे व्हाईस चेअरमन श्रीपाद कुलकर्णी, मंडळाचे सदस्य स्वप्निल कुलकर्णी यांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# बांधकाम क्षेत्रातील स्ट्रक्चरल इंजिनिअरिंग संबंधित सर्वोत्तम कार्यपद्धती आणि कामाच्या ठिकाणी होणारी जीवितहानी टाळणे

बांधकाम उद्योगात स्ट्रक्चरल इंजिनिअरिंगचे तांत्रिक नियोजन आणि प्रत्यक्ष जागेवर होणारी अंमलबजावणी यांमध्ये अनेकदा तफावत आढळून येते. बांधकाम उद्योगातील कामगारांच्या कौशल्यामध्ये मोठ्या सुधारणेची आवश्यकता आहे. तसेच, काँक्रिटींग पूर्वी सळ्या निकामी झाल्यामुळे जागेवर दुर्घटना घडून येतात. या लेखात काही उदाहरणे दिली आहेत, ज्याद्वारे आपण साईटवरील दुर्घटना टाळू शकतो. तसेच, या लेखात बीम आणि कॉलम मधील रिइन्फोर्समेंटच्या सर्वोत्तम बांधणी पद्धतींबद्दलही माहिती दिली आहे.

साईटची परिस्थिती समजून घेणे आणि आर्किटेक्ट व स्ट्रक्चरल इंजिनिअरला सूचित करणे, यात साईट अभियंत्याची महत्त्वाची भूमिका असते. साईटच्या परिस्थितीत होणारे कोणतेही बदल तांत्रिक लोकांना कळवले पाहिजेत. साईटवरील अंमलबजावणी संदर्भात विचारात घेण्यासाठी खाली काही उदाहरणे दिली आहेत.

**१) उभ्या सळ्यांमुळे होत असलेली दुर्घटना –** बहुतेकदा, बांधकामा दरम्यान स्तंभांमधून (columns) उभ्या सळ्या बाहेर आलेल्या आपण पाहतो. जर एखादी व्यक्ती या सळ्यांवर पडली, तर तिला गंभीर दुखापत होऊ शकते; कारण या उभ्या सळ्या शरीरात घुसून आरपार जाण्याची शक्यता असते. हे टाळण्यासाठी, एक साधा उपाय म्हणजे या सळ्या ९० अंशांच्या कोनात वाकवणे आणि वाकवलेल्या भागाची लांबी किमान ६ इंच ठेवणे. यामुळे कोणतीही जीवितहानी टाळता येते. तसेच, या सळ्यांच्या टोकांवर 'मशरूमकॅप्स' (सुरक्षा टोप्या) बसवूनही अशा दुर्घटना टाळता येतात.




अ) वाक नसलेल्या सळ्यांमुळे अपघात होऊ शकतो.
ब) वाकवलेले सळी जीवितहानी कमी करतात.
Figure 1 - पुढील बांधकामासाठी स्तंभांच्या उभ्या सळ्या बाहेर काढल्या जातात.

**२) स्तंभाच्या सळ्याखाली पडण्यापासून रोखणे –** इमारतीचे बांधकाम करताना, काँक्रीटिंग करण्या पूर्वी स्तंभातील (Column) उभ्या सळ्यांची लांबी साधारणपणे ३ मीटर पर्यंतच मर्यादित ठेवावी. तसेच, स्तंभातील सर्व सळ्यांना एकत्र धरून ठेवण्यासाठी त्यामध्ये 'लिंक्स' (Links) असणे आवश्यक आहे. यामुळे सळ्या बाजूला कलणार नाहीत किंवा पडणार नाहीत, याची खात्री होईल.





Figure 2 - स्तंभाच्या सळ्या खाली पडण्यापासून रोखणे

**३) कोअरचे बीम मधील लोकेशन –** जर बीममध्ये ओपनिंग दिलेल्या नसतील, तर एसी बसवण्यासारख्या सेवांसाठी आरसीसी बीममध्ये नाइलाजाने कोअर घ्यावे जाते (तरी शक्यतो टाळावे). कोअरचे स्थान निश्चित करताना बीमच्या मजबुतीचा विचार करणे आवश्यक आहे. बीमच्या सर्वात वरच्या किंवा सर्वात खालच्या भागात कोअर कापणे टाळावे; कोअर बीमच्या न्यूट्रलक्सिसवर म्हणजेच बीमच्या मध्यभागी कापता येऊ शकतो. तसेच, कॉलमसपोर्टजवळ बीममध्ये कोअर कापणे टाळावे; कोअर आणि कॉलममध्ये किमान L/4 मीटर अंतर ठेवण्याचा सल्ला दिला जातो.





Figure 3 - कोअरचे बीम मधील लोकेशन

**४) कॉलम आणि बीम जॉईंट मधील अँकरेजची लांबी –** Figure 4 –कॉलम आणि बीमजॉईंटमधील अँकरेजची लांबी बीम पासून वरच्या आणि खालच्या बाजूला असलेल्या शेवटच्या कॉलम मधील सळ्या, कॉलमच्या आतील बाजूपासून LD+10xdb इतक्या लांबीने अँकर करणे आवश्यक आहे. येथे db म्हणजे सळीचा व्यास आणि LD म्हणजे सळीची डेव्हलपमेंट लांबी, जी काँक्रीट आणि रिइन्फोर्समेंटच्या ग्रेडनुसार 40xdb ते 50xdb इतकी असते. बीममधून कॉलममध्ये लोड हस्तांतरित करण्यासाठी कॉलममध्येही अँकरेज लांबी देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यामुळे भूकंपाच्या शक्तींना प्रतिकार करण्यास मदत होईल.





Figure 4 - कॉलम आणि बीम जॉईंट मधील अँकरेजची लांबी

**५) बीम कॉलम जॉइंटवर डेव्हलपमेंट लेंथ शिवाय बार कापणे स्वीकारार्ह नाही –** वरचे आणि खालचे सळ्या अनेकदा कॉलमच्या ठिकाणी, कॉलममधील c/c अंतराशी जुळवून कापले जातात, ही बांधकामाची चुकीची पद्धत आहे. एका बीमवरून दुसऱ्या बीमवर लोड हस्तांतरित करण्यासाठी LD हि पूर्ण डेव्हलपमेंट लांबी (40xdb ते 50xdb) देणे आवश्यक आहे.





Figure 5 - सळ्यांची कापणी ही बीमलांबी इतकी किंवा दोन स्तंभांमधील अंतरा इतकी केली जाऊ नये. डेव्हलपमेंट लेंथ LD देऊन कापणी करणे आवश्यक

६) बीमसाठी लॅपिंग झोन – बीमच्या मध्यभागी खालच्या बाजूला आणि स्तंभाच्या आधारापाशी वरच्या बाजूला ताण (tension) निर्माण होत असल्यामुळे या जागांवर 'लॅपिंग' (सळ्या जोडणे) करणे टाळावे. बीमच्या वरच्या बाजूच्या सळ्यांचे लॅपिंग मध्यभागात L/३ क्षेत्रामध्ये, तर खालच्या बाजूच्या सळ्यांचे लॅपिंग स्तंभाच्या दर्शनी भागापासून (column face) L/4 क्षेत्रामध्येच केले जावे.





Figure 6 - बीमसाठी लॅपिंग झोन

**७) कॉलमसाठी लॅपिंग झोन –** कॉलमच्या उंचीच्या मधल्या अर्ध्या भागात सळ्या लॅप केले पाहिजेत. टोकांवर कॉलम सळ्या लॅप करणे टाळावे, कारण तिथे कॉलमवर जास्त ताण (tension) येतो. सर्व कॉलम च्या सळ्या एकाच ठिकाणी लॅप करू नयेत, सळ्या एका आड एक पद्धतीने (स्टॅगर्ड) लॅप केले पाहिजे.





Figure 7 - कॉलमसाठी लॅपिंग झोन

८) Concentric आणि eccentric फुटिंग – जर स्ट्रक्चरल इंजिनिअरने मध्यभागी कॉलम असलेले फूटिंग डिझाइन केले असेल, परंतु उत्खननानंतर फूटिंगसाठी कमी जागा शिल्लक राहिली, तर कॉलमचे स्थान बदलता येत नाही कारण त्यामुळे रूमच्या आकारात बदल होईल. म्हणून, साइटवरील लोक कॉलमचे स्थान तेच ठेवून फूटिंग सरकवतात, ज्यामुळे कॉलम मध्यभागी नसल्याने फूटिंग विकेंद्रित (eccentric) होते. यामुळे, आकृती ८ ब मध्ये दाखवल्या प्रमाणे फूटिंगमध्ये उचल निर्माण होते. हे बशीच्या काठावर ठेवलेल्या चहाच्या कपासारखे आहे, ज्यामुळे बशीचे दुसरे टोक वर उचलले जाते. तसेच, असे दिसून आले आहे की विकेंद्रित ठेवलेल्या कॉलमचा भू–धारण दाब, मध्यभागी असलेल्या कॉलमच्या भू–धारण दाबापेक्षा १.५ ते २ पट जास्त असतो. म्हणून, कॉलमच्या स्थानाचा विचार करणे आवश्यक आहे. जेव्हा कॉलम फूटिंगच्या मध्यभागी नसेल, तेव्हा मूळ ड्रॉइंग आणि डिझाइनमध्ये बदल करून मोठ्या आकारा फूटिंग तयार करणे आणि वरच्या व खालच्या दोन्ही बाजूंना सळ्या लावणे आवश्यक आहे.

अ) फुटिंगच्या मध्यभागी स्तंभ असलेली initial design ब) साईटची स्थिती अशी आहे की : स्तंभ हा पायाच्या मध्यभागी नाही क) पायाचे (Footing) अंतिम design





Figure 8 - कॉलमचा पाया जिथे कॉलम मध्यात नाही

९) कॉलम pile वर सपोर्ट असणे – एकाच पाइलवर (pile) आधारलेल्या स्तंभाच्या (column) बाबतीत, तो स्तंभ पाइलच्या अगदी मध्यभागी (केंद्रावर) स्थित असावा. स्तंभ कोणत्याही एका बाजूला सरकलेला नसावा. जर स्तंभ पाइलच्या मध्यरेषेच्या बाहेर सरकला, तर त्यामुळे 'मोमेंट' निर्माण होते, जिचा प्रतिकार करणे एका पाइलच्या आधाराला शक्य नसते; म्हणूनच, स्तंभाचे पाइलच्या मध्यरेषेबाहेर सरकणे चालत नाही.





Figure 9 - कॉलम pile वर सपोर्ट असणे

लेखक – **केदार मंजिरी गिरीश सभारंजक**
M.Tech Structures (COEP)
Chartered Engineer (India)
GIStructE (UK)
पत्ता –पहिला मजला,
मोरया एजन्सीजच्यावर,
भवानीनगर, मार्केटयार्डमागे,
इंद्रप्रस्थ कार्यालयच्या शेजारी,
अहिल्यानगर– ४१४००१
मो. +९१ ९७६३०१६११७.



AESA
Architects, Engineers & Surveyors Association Ahilyanagar

# रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाचे उपकेंद्र अहिल्यानगर येथे सुरु करण्यात यावे

नगर – जिल्ह्यातील तरुणांना रोजगाराची मोठी संधी उपलब्ध व्हावी, यासाठी अद्ययावत कौशल्य प्रशिक्षण आवश्यक आहे. त्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाचे उपकेंद्र अहिल्यानगर येथे सुरू करण्यात यावे, अशी मागणी कौशल्य विकास समितीचे सदस्य व भारतीय जनता पक्षाचे जिल्हा समन्वयक विनायक देशमुख यांनी जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पा. यांच्याकडे केली.



रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाचे उपकेंद्र अहिल्यानगर येथे सुरु करण्यात यावे, या मागणीचे निवेदन पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांना देताना कौशल्य विकास समितीचे सदस्य व भारतीय जनता पक्षाचे जिल्हा समन्वयक विनायक देशमुख आदी.

श्री. देशमुख यांनी ना.डॉ. राधाकृष्ण विखे पा. यांची जिल्हाधिकारी कार्यालयात भेट घेऊन त्यांना यासंदर्भातील निवेदन दिले. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग (दक्षिण विभाग), अनिल मोहिते (महानगर) व नितीन दिनकर (उत्तर विभाग) उपस्थित होते.

यावेळी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राज्यस्तरावर रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाची स्थापना करण्यात आली असून त्याची उपकेंद्रे मुंबई, नागपूर, पुणे व ठाणे येथे कार्यान्वित झाली आहेत. कौशल्य विद्यापीठाच्या अंतर्गत इंजिनिअरिंग व्यवस्थापन व तंत्रज्ञान, डिझाईन, क्रिएटिव्ह स्किल्स, ह्युमॅनिटी स्किल्स, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, आर्टिफिसिअल इंटेलिजन्स अशा विविध क्षेत्रातील उद्योग आस्थापनांशी सुसंगत अभ्यासक्रम विद्यापीठाने स्वतः तयार केले आहेत. या अभ्यासक्रमांचा फायदा केवळ शहरी भागात सिमित न राहता ग्रामीण भागातील तरुणांपर्यंत पोहचविण्यासाठी अहिल्यानगर येथे या विद्यापीठाचे उपकेंद्र सुरू होणे आवश्यक आहे. यासाठी आवश्यक असणारी जागा अहिल्यानगर येथील शासकीय तंत्रनिकेतन प्रांगणात उपलब्ध होऊ शकेल, असे श्री.देशमुख यांनी निवेदनात नमुद केले आहे.

याबाबत अधिक माहिती देताना श्री. देशमुख यांनी सांगितले, तरुणांना उद्योग–आधारित उच्च दर्जाचे कौशल्य शिक्षण देणे, रोजगाराच्या संधी निर्माण करणे, उद्योजकतेला प्रोत्साहन देणे, उद्योग भागीदारीद्वारे कौशल्य विकास, स्टार्टअप्स, इन्क्यूबेशन आणि स्वयंरोजगारास चालना देणे, हे रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाचे ध्येय आहे. तरुणांना अत्याधुनिक तांत्रिक आणि व्यावहारिक कौशल्ये शिकवून त्यांना रोजगारासाठी सक्षम करणे, उद्योगांच्या गरजांनुसार (Industry-oriented) अभ्यासक्रम तयार करून शिक्षण देणे, ज्यामध्ये ६०% ऑन–द–जॉब ट्रेनिंग (OJT) आणि ४०% वर्गशिक्षण असणार आहे. विद्यार्थ्यांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रोत्साहन देणे, मार्गदर्शन करणे (Counselling) आणि स्टार्ट–अप्ससाठी इन्क्यूबेशन केंद्र उपलब्ध करून देणे, यासाठी हे विद्यापीठ कार्यरत असणार आहे. समाजातील सर्व स्तरांतील, विशेषतः महिलांना, कौशल्य आत्मसात करून सक्षम करण्यावर विशेष भर दिला जाणार आहे. जागतिक मानकांनुसार कौशल्य प्रशिक्षण देऊन महाराष्ट्रातील तरुणांना जागतिक बाजारपेठेत स्पर्धा करण्यासाठी तयार करण्याच्या उद्देशाने राज्य सरकार कार्यरत असुन एआय (AI), सायबर सुरक्षा, आयओटी (IoT) यांसारख्या आधुनिक आणि नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण देऊन भविष्यातील कार्यशक्ती (Future-ready workforce) तयार करण्याचा महाराष्ट्र शासनाचा हा महत्त्वाकांक्षी प्रयत्न आहे. या विद्यापीठाच्या माध्यमातून विद्यापीठ महाराष्ट्राला 'ग्रोथ इंजिन' बनवण्यासाठी कुशल मनुष्यबळ निर्माण करण्यावर विशेष भर दिला जात असुन जिल्ह्यातील जास्तीत जास्त तरुणांचा यात सहभाग वाढण्यासाठी अहिल्यानगर येथे रतन टाटा महाराष्ट्र कौशल्य विद्यापीठाचे उपकेंद्र होणे आवश्यक असल्याची श्री. देशमुख यांनी सांगितले.

RATAN TATA MAHARASHTRA STATE SKILLS UNIVERSITY

# 'गुलमोहर' व 'फिरोदिया शिवाजीयन्स'ची 'अॅलेक्स कप'मध्ये विजयी आगेकूच

**गुलमोहरचा ५–० विजय**

नगर – शहरातील भुईकोट किल्ला मैदानावर सुरू असलेल्या अॅलेक्स कपच्या ८ व्या पर्वातील फुटबॉल स्पर्धेत ७ मे रोजी रंगलेल्या दोन चुरशीच्या सामन्यांमध्ये गुलमोहर स्पोर्टस क्लब आणि फिरोदिया शिवाजीयन्स अकॅडमी यांनी विजय मिळवत उपांत्य फेरीत धडक मारली. उत्कृष्ट खेळ, वेगवान पासिंग आणि गोलसमोर अचूक फिनिशिंग यामुळे गुरुवारचे सामने प्रेक्षकांसाठी विशेष आकर्षण ठरले.





दिवसातील पहिला सामना गुलमोहर फुटबॉल क्लब आणि अहमदनगर डिस्ट्रिक्ट फुटबॉल असोसिएशन यांच्यात झाला. सामन्याच्या सुरुवातीपासूनच गुलमोहरच्या खेळाडूंनी आक्रमक खेळ करत प्रतिस्पर्धी संघावर वर्चस्व निर्माण केले. जलद हालचाली, अचूक पासिंग आणि समन्वयपूर्ण खेळाच्या जोरावर गुलमोहरने तब्बल ५–० गोलने विजय संपादन केला.

सामन्याच्या १६ व्या मिनिटाला प्रणव पंडित याने पहिला गोल करत संघाचे खाते उघडले. त्यानंतर आदित्य गुगळे याने २२ व्या आणि ३८ व्या मिनिटाला सलग दोन गोल करत संघाला मजबूत आघाडी मिळवून दिली. ३३ व्या मिनिटाला पार्थ मस्कर याने आणखी एक गोल करत प्रतिस्पर्ध्यांवरील दबाव वाढवला. सामन्याच्या ४७ व्या मिनिटाला अहमदनगर डिस्ट्रिक्ट संघाकडून झालेल्या 'ऑन गोल'मुळे गुलमोहरच्या खात्यात पाचवा गोल जमा झाला. संपूर्ण सामन्यात अहमदनगर डिस्ट्रिक्ट संघाला एकही गोल करता आला नाही.

दिवसातील दुसरा सामना सुमन फुटबॉल क्लब आणि फिरोदिया शिवाजीयन्स अकॅडमी यांच्यात रंगला. दोन्ही संघांनी सुरुवातीपासून सावध आणि बचावात्मक खेळ करत एकमेकांना जोरदार टक्कर दिली. आक्रमण आणि प्रतिआक्रमणांच्या मालिकेनंतरही नियोजित वेळेत कोणत्याही संघाला गोल करता आला नाही. त्यामुळे सामना ०–० गोलने अनिर्णित राहिला.

यानंतर सामन्याचा निकाल पेनल्टी टायब्रेकरवर लागला. अत्यंत तणावपूर्ण वातावरणात फिरोदिया शिवाजीयन्स अकॅडमीने ४–३ गोलने विजय मिळवत उपांत्य फेरीत प्रवेश निश्चित केला. सुमन फुटबॉल क्लबकडून अविनाश शिंदे, अक्षय गायकवाड आणि तनिष्क गायकवाड यांनी प्रत्येकी एक गोल केला. तर फिरोदिया शिवाजीयन्स अकॅडमीकडून ट्रस्क डमपुई, जोसी ललसाईमसंग, जोसेफ पुया आणि क्लिमेंट चँगसन यांनी अचूक गोल करत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.

## धनादेश न वटल्याप्रकरणी कारावासाची शिक्षा

नगर – शहरातील आशीर्वाद ट्रेडिंग कंपनी या किराणा मालाचे घाऊक विक्री करण्याचा व्यवसाय आहे. आरोपी राहुल धोंडीराम पोखर्णा हे राहुल किराणाचे प्रोप्रायटर असून आशीर्वाद ट्रेडिंग कंपनी येथून घेतलेल्या किराणा मालाच्या उधारीच्या रकमे पोटी दिलेला धनादेश न वाटल्याने अहमदनगर येथील अति मुख्य न्यायालय यांनी आरोपीला राहुल पोखर्णा यांना कोर्टाने एक महिन्याच्या कारावासाची व ६१ हजार रुपये दंडाची शिक्षा व न भरल्यास पंधरा दिवसाची साधी देण्यात येईल अशी शिक्षण सुनावलेली आहे

आरोपीने आशीर्वाद ट्रेडिंग कंपनीकडून उधारींनी किराणामाल घेतला होता. सदरील मालाची होणारी रक्कम आशीर्वाद ट्रेडिंग कंपनीला अदा करण्याकरता आरोपीस दीड ते दोन महिन्याचा अवधी देण्यात आला होता. आशीर्वाद ट्रेडिंग कंपनीने २०२४ या कालावधीमध्ये तारखांना व बिलानुसार रुपये रक्कम ४३ हजार ६३३ रुपये किमतीचा किराणामाल उधारीचे घेतलेला होता. फिर्यादीने आरोपीकडे वेळोवेळी सदर रकमेची मागणी केली होती. सरते शेवटी आरोपीने खरेदी यांना अ. नगर मर्चंट को. ऑ. बँक, अ.नगर रकमे रुपये ४३६३३ रुपये रुपयाचा धनादेश दिला होता. तो फिर्यादी यांनी बँकेमध्ये भरला असता अनादरीत झाला. त्यानुसार फिर्यादी यांनी न्यायालयात फिर्याद दाखल केली होती, फिर्यादीच्यावतीने श्रीमती पुष्पालता सुरेशलाल कटारिया यांची साक्ष आणि सचिन सुरेशलाल कटारिया यांची साक्ष महत्वाची ठरली. प्रकरणात दाखल केलेल्या कागदोपत्री पुरावा दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ग्राह्य धरून आरोपीला दोषी धरण्यात आली. सदर प्रकरणात फिर्यादी यांच्या वतीने अॅड. शिवा शिंदे यांनी काम पाहिले तसेच अॅड. अशिष पोटे, महेश डौचे यांनी सहकार्य केले.

# सीए अहिल्यानगर शाखेमध्ये प्रत्यक्ष कर कॉन्फरन्स उत्साहात

नगर – इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया अहिल्यानगर शाखा येथे आयोजित करण्यात आलेली डायरेक्ट टॅक्स कॉन्फरन्स २०२६ उत्साहात पार पडली. परिवर्तन ही प्रगती आहे – या संकल्पनेवर आधारित ही दोन दिवसीय परिषद १ व २ मे रोजी आयोजित करण्यात आली होती.



या परिषदेत नवीन आयकर कायदा २०२५, आयकर रिटर्न व असेसमेंट प्रक्रिया, कॅपिटल गेन, सर्च अॅण्ड सिझर, चॅरिटेबल ट्रस्ट तरतुदी यांसारख्या विविध महत्त्वपूर्ण विषयांवर तज्ज्ञ वक्त्यांनी मार्गदर्शन केले.

परिषदेत डायरेक्ट टॅक्स कमिटीचे उपाध्यक्ष सीसीएम सीए पंकज शाह यांनी भांडवली लाभ, अनुमानित व्यावसायिक उत्पन्न व महत्त्वपूर्ण कर वजावटी या विषयावर तर सीए प्रसाद भंडारी यांनी आयकर रिटर्न व कर निर्धारण कार्यपद्धती, यावर सविस्तर विवेचन केले. तर परिषदेच्या दुसऱ्या दिवशी सीसीएम सीए विष्णू अगरवाल यांनी आयकर कायद्यान्वये झडती, जप्ती व सर्वेक्षण या विषयावर मार्गदर्शन केले. तर सीए मनीष डाफ्रिया यांनी नवीन आयकर अधिनियम २०२५ अंतर्गत धर्मादाय ट्रस्ट संबंधी तरतुदी या विषयी माहिती दिली.

याशिवाय सीसीएम सीए पियुष छाजेड यांनी झूम मिटिंगद्वारे उपस्थितांशी संवाद साधत भागीदारी फर्म व एल.एल.पी.ना लागू असणाऱ्या या नवीन प्रत्यक्ष कराच्या तरतूदी या विषयावर मार्गदर्शन केले.

अहिल्यानगर ब्रँचचे अध्यक्ष सीए अभयकुमार कटारिया यांनी कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक केले. या दोन दिवसीय परिषदेचे सूत्रसंचालन सीए काजल चंदे, सीए प्रिया तलेरजा चौधरी यांनी पहिल्या दिवशी व दुसऱ्या दिवशी सीए सुनंदा रच्चा, सीए प्रेरणा गांधी यांनी केले. अहिल्यानगर शाखेच्या डायरेक्ट टॅक्स कमिटीचे सदस्य सीए. प्रसाद भंडारी (माजी अध्यक्ष), सीए रितेश हिरानंदानी, सीए प्रिया तलरेजा चौधरी, सीए जयेश रोहीडा, सीए प्रेरणा गांधी, सीए स्वप्नील पवार यांनी परिषद यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले. या परिषदेला अहिल्यानगर सीए शाखेचे माजी अध्यक्ष, जिल्ह्यातील चार्टर्ड अकाउंटंट्स, कर सल्लागार यांचा प्रतिसाद लाभला. नवीन आयकर कायद्याविषयी अद्ययावत माहिती व व्यावहारिक मार्गदर्शन मिळाल्याने सहभागी सदस्यांनी समाधान व्यक्त केले. आभार प्रदर्शन सचिव सीए महेश भळगट, उपाध्यक्ष सीए महेश तिवारी व माजी अध्यक्ष सीए प्रसाद पुराणिक यांनी केले

# निरामय

## उन्हाळ्यात डोळे जपा

**उन्हाळा सुरू होताच वाढलेली उष्णता, धूळ आणि सूर्याच्या तीव्र किरणांमुळे डोळ्यांच्या तक्रारीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. विशेषतः डोळ्यांतून पाणी येणे, जळजळ, डोळे कोरडे पडणे आणि ॲलर्जी यासारख्या समस्यांनी नागरिक त्रस्त झाले आहेत. लहान मुलांमध्येही या तक्रारी वाढल्या आहेत.**

### काय काळजी घ्याल?

- उन्हात बाहेर पडताना सूर्यकिरणांपासून डोळ्यांचे संरक्षण असलेले चष्मे वापरा.
- मोठ्या काठाची टोपी वापरल्यास डोळ्यांवर येणाऱ्या किरणांचा प्रभाव कमी होतो.
- शरीरात पाण्याची कमतरता होऊ नये यासाठी भरपूर पाणी प्या.
- वातानुकूलित यंत्रणेची (एसी) हवा थेट चेहऱ्यावर येणार नाही याची काळजी घ्या.
- सकाळी ११ ते सायंकाळी चार या वेळेत शक्यतो बाहेर जाणे टाळा.
- डोळ्यांमध्ये कोरडेपणा किंवा जळजळ जाणवल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याने 'आर्टिफिशियल टीअर्स'चा वापर करा.
- घरी आल्यावर डोळ्यांवर थंड पाणी मारा.



आरोग्यमंत्र

उन्हाळ्यात उष्णतेमुळे आणि वातानुकूलित यंत्रणेच्या वापरामुळे डोळ्यांमधील ओलावा कमी होतो. त्यामुळे डोळे कोरडे पडण्याची समस्या निर्माण होते. यामध्ये डोळ्यांत खडे गेल्यासारखे वाटणे, लालसरपणा आणि जळजळ अशी लक्षणे दिसतात. तसेच, उन्हातील तीव्र अल्ट्राव्हायोलेट किरणांमुळे 'फोटो कैराटायटिस'चा धोका वाढतो. यामुळे डोळ्यांच्या पारदर्शक पडद्यावर (कॉर्निया) परिणाम होऊन डोळ्यांत वेदना, अंधूक दिसणे आणि रेती गेल्यासारखे वाटते. तसेच उन्हाळ्यात जलतरण तलावाचा वापर वाढल्याने 'कंजंक्टिव्हायटिस' (डोळे येणे) या संसर्गजन्य आजाराचे प्रमाणही वाढते.

## मोबाईलचा असाही दुष्परिणाम

आरोग्यजिज्ञासा

आजच्या डिजिटल युगात मोबाइल आणि स्क्रीन मुलांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहे; मात्र सहा महिने ते दोन वर्षे वयोगटातील बालकांसाठी हा 'स्क्रीन टाइम' धोक्याची घंटा ठरत आहे. नुकत्याच झालेल्या संशोधनानुसार, मोबाइलच्या अनिर्बंध वापरामुळे लहान मुलांच्या बोलण्यावर आणि भाषा विकासावर गंभीर परिणाम होत आहे.

बालपणात मुलांचा मेंदू हा मानवी संवादातून विकसित होतो. डोळ्यांचा संपर्क, चेहऱ्यावरील हावभाव आणि प्रत्यक्ष संभाषण यामुळे मुले भाषा शिकतात; मात्र ही जागा 'डिजिटल स्क्रीन' घेते तेव्हा मुलाला आवश्यक भाषिक ज्ञान मिळत नाही. ५० हून अधिक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय अभ्यासांमधून असे सिद्ध झाले आहे, की पालकांच्या अनुपस्थितीत तासन् तास मोबाइल पाहणाऱ्या मुलांमध्ये बोलण्यास उशीर होण्याचे प्रमाण अधिक आहे.

बालकांमधील भाषेचा विकास परस्पर संवादातून होतो. त्यासाठी मूल आणि पालक यांच्यातील दुतर्फा संवाद आवश्यक आहे; मात्र 'स्क्रीन टाइम' बोलणे, गोष्टी सांगणे अशा पारंपरिक संवादाची जागा घेतो तेव्हा मुलाला आवश्यक भाषिक ज्ञान मिळत नाही. पालकांसोबत स्क्रीन पाहण्याने परस्पर संवादामुळे काही धोके कमी होऊ शकतात; मात्र दीर्घकाळ आणि पालकांच्या देखरेखीशिवाय स्क्रीन विशेषतः मोबाइल पाहणे हा चिंतेचा विषय ठरत आहे.



काय काळजी घ्याल?

*शक्यतो दोन वर्षांखालील मुलांनी स्क्रीनचा वापर टाळावा

*मुलांचे स्क्रीन पाहणे पूर्णपणे बंद न करता वापर मर्यादित आणि सजगपणे करा

*लहान वयात मानवी संवादाला पर्याय नसल्याने स्क्रीनमुळे संवाद थांबणार नाही, याची काळजी घ्या

*बालकांच्या भाषा विकासासाठी निरोगी संवाद साधने, तसेच बोलणे गरजेचे

*रडणाऱ्या मुलाला शांत करण्यासाठी स्क्रीन देण्याची सवय टाळा.

## तरुणांमध्येही हृदयविकार



**आजकाल अनेकांमध्ये कोलेस्ट्रॉलची समस्या वाढताना दिसत आहे. केवळ प्रौढ व्यक्ती नाही, तर तरूणांमध्येही ही समस्या मोठ्या प्रमाणात पाहायला मिळते. सुरुवातीला साधा वाटणारा हा त्रास पुढे हृदयविकाराच्या गंभीर समस्यांचे कारण ठरू शकतो. आपल्या शरीरात कोलेस्ट्रॉल वाढते, तेव्हा शरीर काही ना काही संकेत देत असते.**

आरोग्यचर्चा

कोलेस्ट्रॉलचे दोन प्रकार असतात, यामध्ये एलडीएल आणि एचडीएल यांचा समावेश आहे. यापैकी 'एलडीएल' ला वाईट कोलेस्टेरॉल म्हटले जाते. याचे कारण ते रक्तवाहिन्यांमध्ये साचून प्लाक तयार करते आणि हृदयाच्या समस्यांचा धोका वाढवते, तर 'एचडीएल' चांगले कोलेस्ट्रॉल मानले जाते. रक्तात 'एलडीएल' कोलेस्ट्रॉलचे प्रमाण वाढले, की हृदयविकाराचा झटका, स्ट्रोक आणि इतर गंभीर आजारांचा धोका वाढतो. ही समस्या अचानक वाढते, सुरुवातीला कोणतीही ठळक लक्षणे दिसत नाहीत.

**छातीत दुखणे**

छातीत दुखणे हे वाढलेल्या कोलेस्ट्रॉलचे लक्षण आहे. 'एलडीएल' मुळे हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या रक्तवाहिन्यांमध्ये प्लाक साचतो त्यामुळे त्या अरुंद होतात. अशावेळी छातीत दडपण, जळजळ असा त्रास होतो. त्याचप्रमाणे हे दुखणे हात, मान, जबडा किंवा पाठीपर्यंत पसरू शकते.

**त्वचेवर डाग दिसणे**

त्वचेवर दिसणारे पिवळसर डाग किंवा गाठी यांच्याकडे दुर्लक्ष करू नये. हे देखील उच्च कोलेस्ट्रॉलचे एक लक्षण आहे. हे डोळ्यांच्या आसपास, कोपर, गुडघे, बोटांच्या सांध्यांवर किंवा टाचांवर दिसू शकतात. शरीरात जास्त 'एलडीएल' साचल्यामुळे हे डाग तयार होतात. अशावेळी आहारात बदल करूनही समस्या दूर करता येते.

**श्वास घेण्यास त्रास होणे**

श्वास घेण्यास त्रास होणे हाही एक संकेत असू शकतो. रक्तवाहिन्या अरुंद झाल्यामुळे हृदयाला जास्त मेहनत घ्यावी लागते. परिणामी तुमच्या शरीराला पुरेशा प्रमाणात ऑक्सिजन मिळत नाही. त्यामुळे जिने चढताना, वेगाने चालताना किंवा अगदी झोपल्यावरही श्वास घ्यायला त्रास होऊ शकतो.

**पायात वेदना होणे**

तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार पायात वेदना किंवा आकडी येणे (इंटरमिटंट क्लॉडिकेशन) हेदेखील 'एलडीएल' कोलेस्ट्रॉल वाढल्याचे लक्षण असू शकते. यामध्ये चालताना पोटऱ्या, मांड्या किंवा कंबरेमध्ये वेदना होतात. हे रक्तपुरवठा कमी झाल्यामुळे होते आणि यामुळे चालण्याची क्षमतादेखील कमी होते.

**सतत थकवा जाणवणे**

सतत थकवा जाणवणे हेदेखील दुर्लक्षित करू नये. शरीराला पुरेशा प्रमाणात रक्तपुरवठा न झाल्यामुळे स्नायूंना आणि अवयवांना आवश्यक पोषण मिळत नाही. त्यामुळे व्यक्तीला सतत थकल्यासारखे वाटू लागते. हा थकवा आराम करूनही कमी होत नाही.

**स्मरणशक्ती कमी होणे**

ज्या व्यक्तीचे वाईट कोलेस्ट्रॉल वाढलेले असते, त्या व्यक्तीला स्मरणशक्ती कमी होणे, डोकेदुखी किंवा 'ब्रेन फॉग'सारखी लक्षणंही दिसू शकतात. मेंदूकडे जाणाऱ्या रक्तवाहिन्यांमध्ये अडथळा निर्माण झाल्यामुळे लक्ष केंद्रित करणे कठीण होते.

अशावेळी त्या व्यक्तीला चक्कर येण्याचा त्रासही होऊ शकतो.

## प्रसूतीनंतर पाठदुखीचा त्रास

प्रसूतीनंतर महिलांमध्ये पाठदुखीचा त्रास मोठ्या प्रमाणात वाढताना दिसत आहे. हा त्रास अनेकदा दुर्लक्षित केला जातो आणि वेदना तीव्र झाल्यावरच त्यावर उपचार घेतले जातात. उपचारास विलंब केल्यास आणि चुकीच्या बसण्याच्या किंवा उभे राहण्याच्या सवयींमुळे नवमातांमध्ये दीर्घकालीन मणक्याचे आजार होण्याचा धोका वाढतो. गर्भधारणेनंतर होणारी पाठदुखी ही सामान्य गोष्ट समजून अनेक महिला याकडे दुर्लक्ष करतात. हळूहळू ही वेदना वाढत जाऊन दैनंदिन जीवन, शारीरीक हालचाल आणि एकूण आरोग्यावर परिणाम होतो. त्यामुळे नवमातांनी आपल्या मणक्याच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे.

गर्भधारणेदरम्यान महिलांच्या शरीरात अनेक शारीरिक आणि हार्मोनल बदल होतात. त्यामुळे मणक्यावर अतिरिक्त ताण येतो. वजन वाढणे, शारीरीक मुद्रा बिघडणे आणि पोटाचे स्नायू कमकुवत होणे, यामुळे शरीराचा समतोल बिघडतो आणि कंबरेवर ताण येतो. याशिवाय 'रिलॅक्सिन' नावाचा हार्मोन शरीरात स्रवतो. तो लिगामेंट्स आणि सांधे सैल करतो. ते प्रसूतीसाठी आवश्यक असते; मात्र यामुळे मणका आणि पेल्विसमध्ये अस्थिरता निर्माण होऊन वेदना वाढू शकते. प्रसूतीनंतर चुकीच्या पद्धतीने बाळाला उचलणे, स्तनपान करताना चुकीची शारीरीक स्थिती, पुरेशी विश्रांती न घेणे यामुळे समस्या अधिक वाढू शकते. कालांतराने या कारणांमुळे सततची वेदना, पाठीच्या वेदना, स्नायूंचा कडकपणा, वाकताना किंवा वजन उचलताना त्रास, तसेच दीर्घकाळ बसणे किंवा उभे राहणे यात अस्वस्थता अशी लक्षणे जाणवतात. या समस्येकडे दुर्लक्ष केल्यास या दीर्घकालीन वेदना, स्लिप डिस्क किंवा नर्व्हशी संबंधित आजारांमध्ये रुपांतरीत होतात. त्यामुळे महिलांच्या दैनंदिन कामांवर आणि बाळाची काळजी घेण्याच्या क्षमतेवर परिणाम होतो.



स्नायूंचा कडकपणा आणि दीर्घकालीन मणक्याचे विकार उद्भवू शकतात. प्रसूतीनंतर सुमारे ७० टक्के महिलांना पाठदुखीचा त्रास होतो. दर महिन्याला २५ ते ३७ वयोगटातील १० पैकी ७ महिलांना

प्रसूतीनंतर पाठदुखीचा त्रास सामान्यपणे आढळतो आणि तो प्रामुख्याने हार्मोन्समधील चढ-उतार, पोटाच्या स्नायूंचा कमकुवतपणा आणि गर्भधारणा आणि प्रसूतीदरम्यान शरीरावर येणाऱ्या अतिरिक्त ताणामुळे उद्भवतो. अनेक नवमाता बाळाला स्तनपान करताना किंवा बाळाला उचलताना योग्य शारीरीक स्थितीकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे वेदना अधिक वाढू शकते. तसेच, पुरेशी विश्रांती न मिळाल्यानेही ही समस्या गंभीर होते.

गर्भधारणेदरम्यान वाढलेले वजन, शारीरीक स्थितीमधील बदल, हार्मोनल बदल, चुकीची वजन उचलण्याची पद्धत आणि पोटाचे स्नायूंची कमकुवत झाल्याने मणक्यावर अतिरिक्त ताण येतो; मात्र योग्य काळजी घेतल्यास बहुतेक महिला पूर्णपणे बऱ्या होऊन कोणत्याही दीर्घकालीन गुंतागुंतीशिवाय त्यांच्या दैनंदिन आयुष्यात परतू शकतात.

## संधीवाताचा संकेत

वय वाढत असताना सांध्यांची दुखणी वाढत जातात. ही सामान्य गोष्ट मानली जाते; पण, फक्त गुडघेच नाही, तर हाताच्या अंगठ्यातल्या वेदनाही गंभीर आजाराचे लक्षण असू शकतात. बऱ्याचदा लोक अंगठ्याचे किरकोळ दुखणे किंवा अस्वस्थता थकवा म्हणून दुर्लक्षित करतात; पण हेच पुढे जाऊन संधीवाताचे (आर्थरायटिस) चे लक्षण ठरू शकते.

हातातले 'कॉर्पोमेटाकार्पल जॉइंट' (सीएमसीजे) हा भाग आर्थ्रायटिसमुळे जास्त प्रभावित होतो. हा सांधा अंगठ्याच्या खूप तळाशी, मनगटाजवळ असतो. वस्तू घट्ट पकडणे, मोबाइल वापरणे किंवा लहानसहान कामे करणे यासाठी हा सांधा महत्त्वाचा असतो; पण या सांध्यातले कार्टिलेज हळूहळू घासले जाते तेव्हा काही गंभीर समस्या निर्माण व्हायला सुरुवात होते.

व्याधी विकार



या आजाराची ओळख घरच्या घरीही करू शकता. यासाठी अंगठा आणि तर्जनी एकत्र आणून चिमटी बनवण्याची साधी टेस्ट करायची असते. या प्रक्रियेदरम्यान अंगठ्याच्या खालच्या सांध्यात तीव्र वेदना, टोचल्यासारखे जाणवणे किंवा दाब जाणवत असेल, तर ते कार्टिलेज खराब होत असल्याचे संकेत दिसतात. तसेच काही इतर लक्षणांकडेही लक्ष देणे गरजेचे आहे. त्यासाठी सांध्यांभोवती सूज किंवा लालसरपणा दिसतो. सकाळी उठल्यावर सांधे आखडल्यासारखे वाटतात. हाताची पकड कमकुवत होते आणि चहाचा कप किंवा पुस्तक उचलताना त्रास होतो. ही लक्षणे दुर्लक्षित करता कामा नयेत.

सुरुवातीच्या टप्प्यात फिजिओथेरपी आणि काही खास व्यायामांच्या मदतीने हा त्रास कमी करता येऊ शकतो. तसेच, सांध्यांवरचा ताण कमी करण्यासाठी योग्य पद्धतीने वस्तू पकडण्याची सवय लावणेही गरजेचे आहे; पण हाताच्या वेदना कायम असतील, तर लगेचच डॉक्टरांचा सल्ला घेणे महत्त्वाचे आहे.

## झोपेशी तडजोड नको

नवसंशोधन



अपुऱ्या झोपेच्या दुष्परिणामांबाबत बरंच सांगितलं आणि बोललं गेलं आहे. सहा तासांपेक्षा कमी झोप घेणं काहीजणांना महागात पडू शकतं. मधुमेही, उच्च रक्तदाबाचे रुग्ण, हृदयविकार तसंच पक्षाघाताच्या रुग्णांनी पुरेशी झोप घ्यायलाच हवी. अन्यथा, अशा रुग्णांना कॅन्सर होण्याची शक्यता असते, असं एका संशोधनातून समोर आलं आहे. कमी झोपेमुळे तुम्ही इतर काही विकारांना बळी पडू शकता. त्यामुळे पुरेशी झोप घ्या. झोपेबाबत कोणतीही तडजोड करू नका.

## दुर्लक्ष पडेल महागात

दंतारोग्य



दातांकडे, तोंडाच्या आरोग्याकडे लक्ष देणं गरजेचं असतं, हे अनेकांच्या गावीही नसतं. मध्यंतरी केलेल्या सर्वेक्षणातून ही बाब समोर आली आहे. भारतीय लोक तोंडाच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. यामुळे बरेच दंतविकार जडू शकतात. त्यातच मधुमेह आणि दंतविकार यांचा खूप जवळचा संबंध असतो. भारत ही मधुमेहाची राजधानी बनत चालल्यामुळे दातांकडे केलेलं दुर्लक्ष महागात पडू शकतं.

## नियमित तपासणी गरजेची

डोळ्यांचे आरोग्य



डोळ्यांची नियमित तपासणी गरजेची आहे कारण प्रत्येक नेत्रविकाराची लक्षणं दिसून येत नाहीत. त्यामुळे दोन ते तीन महिन्यांनी डोळ्यांची तपासणी करून घ्यायला हवी. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे ज्येष्ठांनी डोळ्यांची जास्त काळजी घेणं गरजेचं आहे. वय वाढू लागल्यावर नेत्रविकार डोकं वर काढू लागतात. त्यामुळे डोळ्यांच्या कोणत्याही तक्रारींकडे दुर्लक्ष होता कामा नये.

## दुसऱ्या सल्ल्याविषयी...



सर्वसाधारणपणे दुर्धर आजारांमध्ये दोन डॉक्टरांचा सल्ला घेतला जातो. एका डॉक्टरांशी सल्लामसलत केल्यानंतर दुसऱ्या डॉक्टरांचाही सल्ला घ्यावा असा विचार अनेकजण करतात. मात्र दुसऱ्या सल्ल्याची ही प्रक्रिया फक्त दुर्धर आजारांपुरती मर्यादित असते असं नाही तर काही लहानमोठे आजार आणि शस्त्रक्रियांसाठीही दुसऱ्या डॉक्टरांचा सल्ला घेता येतो. उपचार सुरू करण्याआधी किंवा शस्त्रक्रियेआधीच दुसऱ्या डॉक्टरांचा सल्ला म्हणजे सेकंड ओपिनियन गरजेचं असतं असं नाही तर औषधोपचारांच्या निर्णयातही हा सल्ला मोलाचा ठरू शकतो. कॅन्सर किंवा इतर दुर्धर आजारांमध्ये नेमकं काय होईल, रुग्ण वाचण्याची शक्यता किती असे अनेक प्रश्न रुग्ण आणि त्याच्या कुटुंबियांना पडलेले असतात. या प्रश्नांची योग्य उत्तरं मिळवण्यासाठी सेकंड ओपिनियन आवश्यक असतं.

सेकंड ओपिनियनमुळे मनातली चलबिचल कमी होते. आपण घेत असलेले उपचार योग्य असल्याची जाणीव झाल्याने काही प्रमाणात निश्चिंती लाभते. योग्य ते मार्गदर्शन मिळतं. शस्त्रक्रिया केल्यावर किंवा उपचार सुरू केल्यानंतर शरीरावर कोणते परिणाम होतील हे जाणून घेण्यासाठीही दुसऱ्या डॉक्टरांचा सल्ला घेता येईल. अर्थात प्रत्येक आजारासाठी दोन डॉक्टरांचा सल्ला घेण्याची गरज नसली तरी काही आजारांमध्ये हा दुसरा सल्ला मोलाचा किंवा दिशादर्शक ठरू शकतो. मात्र दुसरा सल्ला प्रत्येक वेळी बरोबरच असेल असंही नाही. दोन डॉक्टरांनी व्यक्त केलेला अंदाज वेगवेगळाही असू शकतो. अशा वेळी तिसऱ्या सल्ल्याची गरज पडू शकते. म्हणजेच आपल्या शंकांचं पूर्णपणे निरसन होत नाही तोपर्यंत डॉक्टरांचा सल्ला घेत रहाणं गरजेचं आहे. अर्थात इंटरनेटवर शोध घेऊन आपल्या डॉक्टरांवर तसंच त्यांच्या उपचारांवर शंका घेण्यात काहीच अर्थ नाही. आपले डॉक्टर योग्य उपचार करत असल्याची खात्री बाळगायला हवी. दुसऱ्या सल्ल्याची गरज आहे किंवा नाही हे प्रत्येकाने ठरवायचं असतं. आजाराशी संबंधित तज्ज्ञांचा सल्ला घेतल्याने बरेच लाभ होऊ शकतात.

## केसांसाठी कांदा

कांद्याच्या विविध लाभांविषयी आपण जाणतो. कांद्यामुळे केसांना बळकटी मिळते शिवाय केसांची लवकर वाढही होते. केसांचं गळणं थांबवण्यासाठी कांद्याचं तेल वापरता येईल. कांद्याच्या तेलामुळे डोक्याचं रक्ताभिसरण चांगल्या पद्धतीने होतं. मुळांपर्यंत रक्त पोहोचल्याने केस वाढायला मदत होते. कांद्यात सल्फरचं प्रमाण जास्त असतं. यामुळे केसांच्या वाढीला चालना मिळते. यातली काही खनिजंही केसांच्या वाढीसाठी चांगली मानली जातात.



# नावीन्यपूर्ण विकासकामांतून अहिल्यानगरला राज्यातील अग्रगण्य शहर बनविणार

### पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे प्रतिपादन; चितळे रोड येथे नेहरू मार्केट भूमिपूजन समारंभ उत्साहात

नगर – बदलत्या काळानुसार शहरांची रचना आणि सुविधा विकसित करणे ही काळाची गरज असून नावीन्यपूर्ण विकासकामांच्या माध्यमातून अहिल्यानगरला राज्यातील अग्रगण्य शहराची ओळख मिळवून द्यावी. सामान्य नागरिकांना अधिकाधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देत सार्वजनिक सुविधा, आधुनिक बाजारपेठा आणि सार्वजनिक उद्यानांसारख्या प्रकल्पांना प्राधान्य देण्यात येणार असल्याचे प्रतिपादन जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

शहरातील चितळे रोड येथे नेहरू मार्केटचे भूमिपूजन पालकमंत्री विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते. इकार्यक्रमास आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री विखे पाटील म्हणाले, नेहरू मार्केटची स्थापना १९६७ साली झाली असून या बाजारपेठेने शहराच्या व्यापारी विकासात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. आज या मार्केटला नव्या स्वरूपात ऊर्जितावस्था प्राप्त होत आहे. शहर झपाट्याने बदलत असताना जुन्या शहराच्या पाऊलखुणा जपणेही तितकेच महत्त्वाचे आहे. विकास करताना शहराचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा विसरून चालणार नाही, असेही ते म्हणाले.

लोकांच्या गरजा वाढत असून बदलत्या परिस्थितीनुसार शहराची उभारणी करणे आवश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे रोजगार क्षेत्रातही मोठे बदल होत आहेत. त्यामुळे भविष्यातील गरजा लक्षात घेऊन शहरातील सुविधा आणि पायाभूत विकासाची दिशा निश्चित करावी लागणार आहे. आधुनिक बाजारपेठा, सार्वजनिक सुविधा आणि नागरिकांसाठी दर्जेदार नागरी सुविधा निर्माण करण्यावर शासनाचा भर आहे. शहरात अधिकाधिक सार्वजनिक उद्याने उभारण्यास प्राधान्य देण्यात यावे, यासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. नागरिकांना दर्जेदार सार्वजनिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विविध प्रकल्प राबविण्यात येत असून शहर अधिक सुशोभित आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचेही पालकमंत्री विखे पाटील यांनी सांगितले.



नेहरू मार्केटच्या नव्या इमारतीचे भूमिपूजन प्रसंगी मार्गदर्शन करताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे. समवेत आ.संग्राम जगताप, महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, आयुक्त यशवंत डांगे, सुभाष लोंढे, अनिल मोहिते व नगरसेवक. (छाया – लहू दळवी)

ते पुढे म्हणाले, शेतकऱ्यांसाठीही आधुनिक सुविधांनी सुसज्ज स्वतंत्र मार्केट उभारण्याची आवश्यकता आहे. कृषी उत्पादनांना योग्य बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी अशा प्रकारचे नावीन्यपूर्ण प्रकल्प राबविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. नावीन्यपूर्ण प्रयोग आणि नियोजनबद्ध विकासातून शहराचे स्वरूप बदलता येणार असून अहिल्यानगरला राज्यातील आदर्श आणि अग्रगण्य शहर म्हणून विकसित करण्यासाठी विकासकामांना गती देण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

आमदार संग्राम जगताप यांच्या प्रयत्नातून मंजूर झालेल्या ९.३४ कोटी रुपयांच्या निधीतून होणाऱ्या चितळे रोडवरील नेहरू मार्केटच्या नव्या चार मजली इमारतीचे भूमिपूजन पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या हस्ते व आमदार संग्राम जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, आयुक्त यशवंत डांगे, स्थायी समिती सभापती सुभाष लोंढे, भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, राष्ट्रवादी काँग्रेस शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर आदींसह राष्ट्रवादी काँग्रेस भारतीय जनता पार्टी युतीचे नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते नागरिक व प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

प्रास्ताविकात आ.संग्राम जगताप म्हणाले, राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मुळेच शहराच्या विकासासाठी भरीव निधी उपलब्ध झाला असून अनेक मोठे प्रकल्पाचे कामे सुरु झाले आहेत. बऱ्याच वर्षांपासून रखडलेल्या नेहरू मार्केटच्या कामास आता प्रत्यक्षात सुरवात होत आहे. शहरात नव्या अद्ययावत अनेक इमारती उभ्या राहत आहेत. बुरूडगाव रोड वरील मनपाचे जिजामाता भोसले हॉस्पिटल आत पूर्णत्वास येत असून ही इमारत मोठ्या खाजगी हॉस्पिटलला लाजवेल अशी भव्य झाली आहे. नेहरू मार्केटची इमारतही अशीच भव्य व शहराच्या सौंदर्यात भर घालणारी ठरणार आहे. नेहरू मार्केटच्या नव्या इमारतीला जुन्या इमारतीप्रमाणे लुक देण्यात येणार असून टॉवर वर घड्याळही लावण्यात येणार आहे.

यावेळी माजी नगरसेवक बाळासाहेब पवार यांनी नेहरू मार्केटच्या कामाची सविस्तर माहिती देताना सांगितले, नेहरू मार्केटच्या नव्या भव्य चार मजली इमारतीमध्ये भाजी मार्केट तसेच शॉपिंग कॉम्प्लेक्स उभारण्यात येत आहे. याठिकाणी ५३ भाजी विक्रेत्यांसाठी ओटे, प्रत्येक मजल्यावर १६ दुकाने तसेच स्वच्छतागृह उभारण्यात येणार आहे. यासाठी मनपा फंडातून ९.३४ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे.


कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नगरसेवक प्रकाश भागानगरे यांनी केले. यावेळी माजी उपमहापौर गणेश भोसले, नगरसेवक विकी जगताप, उप सभापती वर्षा सानप, नगरसेविका अशा डागवाले, वैशाली ढोणे, मयुरी जाधव, सुजाता पडोळे, भाजपा महिला आघाडीच्या शहराध्यक्ष प्रिया जानवे, कालिंदी केसकर, सागर मुर्तुडकर, सुरज जाधव, माजी नगरसेवक विजय परदेशी, अरविंद शिंदे, संजय चोपडा, निखिल वारे, दत्ता गाडळकर, महेश लोंढे, गणेश कवडे आदींसह नागरिक उपस्थित होते.

### असे आहे नेहरू मार्केट

सुमारे ९ कोटी ३४ लक्ष रुपयांच्या निधीतून तळमजल्यासह तीन मजली मार्केटची उभारणी करण्यात येणार आहे. यामध्ये ५७ गाळे व ५३ ओटे बांधण्यात येणार आहेत. व्यापाऱ्यांना या ठिकाणी आवश्यक त्या सर्व सुविधाही देण्यात येणार आहेत.

## अहिल्यानगरमध्ये १२ मे रोजी ॲड.अच्युतराव पिंगळे यांचा सहस्रचंद्रदर्शन गौरव सोहळा व समर्पित गौरवांकाचे प्रकाशन

नगर – ॲड. अच्युतराव सदाशिव पिंगळे यांचे ८० व्या वर्षात पदार्पण होत आहे. यानिमित्त ॲड. पिंगळे यांचा गौरव सोहळा व त्यांच्या जीवनकार्य व्यवसावर आधारित समर्पित गौरव अंकाचे प्रकाशन १२ मे रोजी सायंकाळी ५ वाजता माऊली सभागृह, झोपडी कॅन्टीनजवळ, सावेडी येथे अयोध्या येथील श्री रामजन्मभूमी तीर्थक्षेत्र, न्यासाचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेवगिरी महाराज यांच्या हस्ते गौरव सत्कार होत आहे.या कार्यक्रमाचे अध्यक्ष खासदार राज्यसभा व सरकारी वकील उज्वल निकम हे आहेत. समर्पित गौरव अंकाचे विमोचन महाराष्ट्र राज्य विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी बेलापूर येथील गोविंद गोधामचे आचार्य महेशजी व्यास यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा होणार आहे.




ॲड.अच्युतराव पिंगळे यांनी विधिमान भारतीय जनता पक्षाचे पहिले जिल्हा सरचिटणीस म्हणून केलेले अलौकिक कार्य तसेच वकिली व्यवसाय करताना अनेक गोरगरीब नागरिकांना विनामोबदला न्याय दिला. व गोरगरीबांसाठी अंत्यसंस्कार मंडळाच्या माध्यमातून मदत केली. अशा अनेक सामाजिक कार्यात झोकून देऊन काम केले आहे.

ॲड.अच्युतराव पिंगळे यांच्या कार्याचा गौरव सोहळा होणार आहे. या कार्यक्रमासाठी नगरकरांनी उपस्थित राहावे. असे आवाहन समितीचे अध्यक्ष ॲड. विश्वासराव आठरे पाटील, उपाध्यक्ष प्रा.भानुदास बेरड, स्वागताध्यक्ष वसंत लोढा, प्रमुख कार्यकारिणी सदस्य राजेंद्र चोपडा, राजेंद्र गांधी, सचिव राजेंद्र काळे, कोषाध्यक्ष डी.एम.कुलकर्णी आणि कार्यकारिणी सदस्य यांनी केले आहे.

## सावेडी बस स्थानकामुळे प्रवाशांना अधिक सुसज्ज सुविधा उपलब्ध होणार

### पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांचे प्रतिपादन; ५ कोटी निधीतून साकारणारे नव्या इमारतीचे भूमिपूजन

नगर – प्रवाशांची संख्या वाढत असल्याने एसटी महामंडळ लोकाभिमुख होत अधिक चांगल्या सोयीसुविधा उपलब्ध करत आहे. आता एसी व इलेक्ट्रॉनिक गाड्या सुरु झाल्या आहेत. आ.संग्राम जगताप यांच्या प्रयत्नामुळे सावेडी बसस्थानकाचे काम आता मार्गी लागले आहे. नव्या बसस्थानकावर स्वच्छता, पाण्याची व्यवस्था व इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. सावेडीच्या नव्या बस स्थानकामुळे नागरिकांना चांगल्या सुविधा उपलब्ध होतील, असे प्रतिपादन पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी केले.



सावेडी बस स्थानकाच्या नव्या इमारतीच्या कामाचे भूमिपूजन करताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे. समवेत आ.संग्राम जगताप, महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, आयुक्त यशवंत डांगे, सभापती सुभाष लोंढे, विभाग नियंत्रक राजेंद्र जगताप यांच्यासह नगरसेवक व पदाधिकारी. (छाया – लहू दळवी)

मनमाड रोड परिसरात सावेडी बस स्थानकाच्या नव्या इमारतीच्या कामाचे भूमिपूजन पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. आ.संग्राम जगताप यांच्या प्रयत्नातून या कामासाठी सुमारे ५ कोटी रुपयांच्या निधी उपलब्ध झाला आहे. या सोहळ्यास आ.काशिनाथ दाते, आ.जगताप, महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, स्थायी समिती सभापती सुभाष लोंढे, महिला बालकल्याण समितीच्या उपसभापती सानप, राज्य परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक राजेंद्र जगताप यांच्यासह नगरसेवक व पदाधिकारी उपस्थित होते.

प्रास्ताविकात आ.संग्राम जगताप म्हणाले, गेल्या अनेक वर्षांपासून सावेडी परिसरासाठी स्वतंत्र बस स्थानकाची मागणी नागरिक करत होते. यासाठी सतत पाठपुरावा करून नव्या बस स्थानकाच्या कामासाठी परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानतो. या बस स्थानका मुळे शहरातील प्रवाशांची चांगली सोय होणार असून येथे जास्तीत अद्ययावत सुविधा उपलब्ध होणार आहेत.

यावेळी भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, राष्ट्रवादी काँग्रेस शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, नगरसेवक निखील वारे, सुरेश बनसोडे, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, अनिल बोरुडे, गणेश कवडे, कुमार वाकळे, रवींद्र बारस्कर, महेश लोंढे, शारदा ढवण, बाळासाहेब पवार, कुमार वाकळे, प्रकाश भागानगरे आदी उपस्थित होते.





पत्रकार चौक ते डीएसपी चौक रस्त्यावर उभारण्यात आलेल्या नव्या अत्याधुनिक एलईडी पथदिव्यांचे लोपार्पण पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या हस्ते हस्ते झाले. यावेळी आ.काशिनाथ दाते, आ.संग्राम जगताप, महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, आयुक्त यशवंत डांगे, स्थायी समिती सभापती सुभाष लोंढे यांच्यासह नगरसेवक व पदाधिकारी उपस्थित होते. (छाया – लहू दळवी)

## 'पत्रकार चौक' ते 'डीएसपी चौक' दरम्यान अत्याधुनिक एलईडी पथदिव्यांचे लोकार्पण

नगर – शहरातील तारकपूर येथे पत्रकार चौक ते डीएसपी चौक दरम्यान लावण्यात आलेल्या एलईडी पथदिव्यांचे लोकार्पण पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या हस्ते झाले. आ.संग्राम जगताप यांच्या संकल्पनेतून या मार्गावर लावण्यात आलेल्या आकर्षक अत्याधुनिक सेंट्रल लाईन एलईडी पथदिव्यांमुळे हा परिसर लख्ख प्रकाशाने उजळला आहे. यावेळी मंत्री विखे यांनी आ.संग्राम जगताप यांचे कौतुक करून नगर शहर आता झपाट्याने बदलत असून पुण्या मुंबई सारखे रस्ते व पथदिव्यांमुळे शहराचे वैभव व सौंदर्य वाढत आहे, अशा भावना मंत्री विखे यांनी व्यक्त केल्या.

आ.संग्राम जगताप यांच्या प्रयत्नांमुळे नुकतेच पत्रकार चौक ते डीएसपी चौक रस्त्याचे काँक्रीटीकारणाचे काम पूर्ण झाले आहे. आता या मार्गावर अत्याधुनिक एलईडी पथदिवे बसवण्यात आले आहेत. शुक्रवारी सायंकाळी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या हस्ते या अत्याधुनिक एलईडी पथदिव्यांचे लोकार्पण झाले. यावेळी आ.काशिनाथ दाते, आ.संग्राम जगताप, महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, आयुक्त यशवंत डांगे, स्थायी समिती सभापती सुभाष लोंढे, भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, राष्ट्रवादी काँग्रेस शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर आदींसह राष्ट्रवादी काँग्रेस भारतीय जनता पार्टी युतीचे नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते, स्थानिक नागरिक व प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

आ.संग्राम जगताप म्हणाले, शहराच्या विकासासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे भरपूर सहकार्य करत निधी उपलब्ध करून देत आहेत. शहरातील पथदिव्यांसाठी राज्य सरकार कडून विशेष निधी उपलब्ध झाला असून नवे पथदिवे हे मुंबईच्या धर्तीवर अद्ययावत आहेत. मुंबई सारख्या मेट्रो सिटी सारख्या अद्ययावत सुविधा नगरमध्ये निर्माण करण्याचा माझा प्रयत्न आहे.

## 'भूसंपादन प्रक्रियेत' पारदर्शकता राखून मोबदला वितरण तातडीने करा : ना.विखे

### सुरत – चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्ग प्रकल्पासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक

नगर – सुरत–चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्ग प्रकल्पासाठी सुरू असलेल्या भूसंपादन प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता राखून कामकाज करण्यात यावे. जमीन संपादन करताना संबंधित जमिनीबरोबरच त्या ठिकाणी असलेली झाडे, विहिरी, पाईपलाईन तसेच इतर मालमत्तांचे मूल्यांकन अचूक व निश्चित कार्यपद्धतीनुसार करण्यात यावे. मूल्यांकन प्रक्रियेत कोणतीही तफावत राहणार नाही व शासनाच्या निश्चित कार्यपद्धतीत कोणताही बदल होणार नाही याची संबंधित अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी, असे निर्देश जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयात सुरत–चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्ग निवाड्यांसंदर्भात आयोजित आढावा बैठकीत पालकमंत्री डॉ. विखे पाटील बोलत होते.

बैठकीस जिल्हाधिकारी पंकज आशिया, उपविभागीय अधिकारी नितीन पाटील, माणिक आहेर, अरुण उंडे, किरण सावंत–पाटील, विशेष भूसंपादन अधिकारी अतुल चोरमारे, सायली सोळंके, राष्ट्रीय महामार्गचे प्रकल्प संचालक मिलिंदकुमार वाबळे, व्यवस्थापक सत्यम राय, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांच्यासह संबंधित विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले, महामार्गासाठी आवश्यक असलेल्या उर्वरित जमिनीचे भूसंपादन तातडीने पूर्ण करण्यात यावे. संबंधित विभागांनी परस्पर समन्वय ठेवून प्रलंबित प्रकरणे जलदगतीने निकाली काढावीत. जमीन संपादित केलेल्या शेतकऱ्यांना राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून प्राप्त झालेला मोबदल्याचा निधी कोणताही विलंब न लावता त्वरित वितरित करण्यात यावा. मोबदला वितरण प्रक्रियेत पारदर्शकता राखून पात्र लाभार्थ्यांना वेळेत रक्कम मिळेल याची दक्षता घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

सुरत–चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्ग हा अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प असून या प्रकल्पामुळे वाहतूक, उद्योग, व्यापार व कृषी क्षेत्राला मोठी चालना मिळणार आहे. त्यामुळे प्रकल्पाशी संबंधित सर्व कामे वेळेत व गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण होणे आवश्यक आहे. प्रकल्पग्रस्त शेतकरी व नागरिकांच्या भावना लक्षात घेऊन प्रशासनाने संवेदनशीलतेने काम करावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी पाचही तालुक्यातील उपविभागीय अधिकाऱ्यांकडून तालुकानिहाय माहिती घेत प्रलंबित विषय तातडीने निकाली काढण्याचे निर्देश दिले.

जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी प्रकल्पाच्या सद्यस्थितीची माहिती देताना सांगितले की, अहिल्यानगर जिल्ह्याच्या अहिल्यानगर, संगमनेर, राहुरी, राहाता व जामखेड या ५ तालुक्यातील ६५ गावांमधून हा महामार्ग जात असून जिल्ह्यातील याची लांबी १३९.५१ किलोमीटर एवढी आहे. या महामार्गासाठी १०४४ हेक्टर आर क्षेत्रापैकी ४११.९०८ हेक्टर आर क्षेत्राचे भूसंपादन पूर्ण झाले असून उर्वरित प्रक्रियेबाबत प्रशासनामार्फत सुरू असलेल्या कार्यवाहीची माहिती दिली. प्रकल्प वेळेत पूर्ण होण्यासाठी आवश्यक ती सर्व मदत व समन्वय करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

## प्रभाते सुर नभी रंगती, दस दिशा भूपाळी म्हणती

किती जुनी आणि समर्पक भूपाळी आहे ही. खरंच का या दहा दिशा भूपाळी म्हणतात? खरच का या दहा दिशा आपल्यावर राज्य करतात? खरंच का या दहा दिशा आपल्या नातेसंबंधांशी जबाबदार असतात? खरंच का या दिशा पंचमहाभूतांशी निगडीत असतात? चंद्र सूर्य भ्रमणाचा, त्या अनुषंगाने वातावरणातील बदलांचा खरच का या दिशांशी, पंचमहाभूतांशी खरंच का काही संबंध असतो? आपल्या मति, गति, प्रगतीवर खरंच का या सर्व घटकांचा परिणाम होतो? या आणि या संबंधित सर्व प्रश्नांची उत्तरे नीट विचार केल्यास होकारार्थीच येतात.

४ प्रमुख दिशा आणि ४ उपदिशा सर्वांना माहिती आहेत. पण या दिशांशिवायही अजून २ दिशा आहेत ना, ज्यांचा विचार फक्त वास्तुशास्त्रात केला जातो. त्या २ दिशा म्हणजे उर्ध्व आणि अधः आपली भारतीय शास्त्र ही सगळी उर्ध्वमुखि आहेत, म्हणजेच सूर्याला साक्षि ठेवून आहेत आणि म्हणूनच या शास्त्रांचे सर्व जगात त्रिकाल महत्त्वाचे स्थान अबाधित आहे. अनेक थेरपी आल्या आणि डब्यात कधी गेल्या ते समजले सुद्धा नाही. कारण भारतीय शास्त्रांचा पाया पक्का आहे आणि ही शास्त्रे सर्व समावेशक आणि बहुव्यापक आहेत.

आपण या शास्त्रांचा शास्त्रीय अंगाने विचार केला तर समजायला अवघड मुळीच नाही. एकीकडे शास्त्र हा शब्द वापरायचा आणि दुसरीकडे तर्कहिन उपाय करायचे ही सध्याच्या काळात एक फशन झाली आहे. आपल्या मनाची उपजत मशागत हीच चुकीची असल्यामुळे आपली फसगत होते. पण स्वतः ला दोष देण्याची किंवा आपली झालेली चुक मान्य करायची आणि त्यातून चुक मान्य करुन ती चुक आपण जो पर्यंत सुधारत नाही आणि त्या शास्त्रांची नीट अभ्यास करून अंमलबजावणी करून नीट अनुभव घेत नाही तो पर्यंत आपल्याला शास्त्रांचा नक्की उपयोगही होणार नाही. कोणतीही भारतीय पुरातन शास्त्रे ही कधिच भोंगळ नव्हती आणि नाहीत. शास्त्रांकडे बघण्याची आपली सारासार पद्धत बदलणे गरजेच आहे.

वास्तुशास्त्र हे एक उत्तम उपाय शास्त्र आहे. वास्तुच्या माध्यमातून आपल्या आयुष्यातल्या घटनांचा अंदाज घेऊन उपाय करणे आणि त्या उपायांच्या माध्यमातून आपली आणि आपल्या कुटुंबीयांची सुटका करण्याचे ते एक परिणामकारक माध्यम आहे.

परंतु आजकाल आपण स्वीकारलेल्या पाश्चिमात्य अर्धवट बांधकाम शैलीचा परिणाम खूप तीव्र आहे आणि त्या मानाने बरेच जण खूप तोकडे उपाय करतात त्यामुळे त्याचा परिणाम हा फार काळ होत नाही किंवा होतच नाही.

१००% वास्तुशास्त्रानुसार बांधकाम करणे हे जरी शक्य नसले तरीसुद्धा जास्तीत जास्त बांधकाम वास्तुशास्त्राप्रमाणे करणे हे सहज शक्य आहे. बरेचसे उपाय हे बांधकामातच होत असतात. त्यासाठी प्रथम बिनचूक प्लॅन असावा लागतो आणि सगळी गडबड आजकाल ॲस्थेटिकच्या नावाखाली प्लॅनमध्येच होते.

त्यामुळे एखादा बंगला बांधताना किंवा फ्लॅट घेताना विचारपूर्वक घेतला तर आपली बरीचशी सोडवणूक ही आधीच झालेली असते.

बंगल्यासाठी आणि फ्लॅटसाठी वास्तुशास्त्र जरी एकच असले तरी विचारधारा मात्र भिन्न आहे. त्यामुळे दोन्हींच्या बाबतीत सावध राहून सजगतेनी काम करणे गरजेचे आहे.

– **कौस्तुभ काळे**, वास्तुज्योतिष सल्लागार, मोबा. ९८५०९४९८८१



## माऊंट सिनाय कॉन्व्हेन्ट स्कूलचा इ.१० वीचा निकाल १०० टक्के

तालुक्यातील सारोळा बद्दी येथील माऊंट सिनाय कॉन्व्हेन्ट स्कूलचा इ.१० वी चा निकाल सलग पाचव्या वर्षी १०० टक्के लागला असून अंजली वायकर हीने ८१.४० टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम येण्याचा मान मिळवला. मयुरेश चव्हाण व अनामिका अवसरकर यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. विद्यालयाच्या वतीने सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा मुख्याध्यापिका जयश्री खरात यांच्या हस्ते पेढा भरवून व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या विद्यार्थ्यांना नेहा केदारे, उज्वला पंडित, अर्चना केदार व कविता आढाव यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे विद्यालयाचे संस्थापक डॉ.शाम खरात, विश्वस्त ज्योत्स्ना शिंदे, ज्योती हासे व राजेश चक्रे यांनी अभिनंदन केले आहे.

